सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २६ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २५९ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### आक्षेपार्ह सोशल मीडिया पोस्टवर पुणे पोलिसांचे विशेष लक्ष

**पुणे :** पुण्यातील आगामी महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोशल मीडियावरील अपप्रचार, खोट्या बातम्या व आक्षेपार्ह पोस्टवर पुणे पोलिस विशेष लक्ष ठेवणार आहेत. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नाकाबंदी, संशयितांवर नजर, प्रतिबंधात्मक कारवाया राबवण्याच्या सूचना देण्यात आल्या. ३१ डिसेंबर, नाताळ आणि कोरेगाव भीमा कार्यक्रमांच्या पार्श्र्वभूमीवरही कडक बंदोबस्त ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

### पक्षातील नेत्यांवर अजित पवार नाराज

**मुंबई :** पक्षातील नेत्यांवर अजित पवार नाराज झाल्याची माहिती सूत्रांनी दिली. पक्षाच्या बैठकीत अजित पवारांनी मंत्र्यांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. नगरपालिका निवडणुकीत मंत्र्यांनी दिलेली जबाबदारी व्यवस्थित पार पाडली असती तर नक्कीश शिवसेनेपेक्षा जास्त जागा निवडून आल्या असत्या असं अजित पवार म्हणालेत. मंत्री बाबासाहेब पाटील, मकरंद पाटील, नरहरी झिरवळ आणि माजी मंत्री बाबा आत्राम यांच्यावर पवार नाराज असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### युतीबाबत शिंदे–नाईक यांच्यात चर्चा

**मुंबई :** एकीकडे महायुतीत मुंबई महापालिकेतील युतीवरून चर्चा सुरू असतानाच यासंदर्भातच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजपचे नेते व मंत्री गणेश नाईक यांच्यात मंत्रालयात बंद दाराआड १५ मिनिटे चर्चा झाली. नवी मुंबई हा गणेश नाईक यांचा बालेकिल्ला मानला जातो. तीन दशकांहून अधिक काळ नवी मुंबईवर गणेश नाईक यांचे वर्चस्व आहे. मात्र एकनाथ शिंदे यांनी गेल्या दोन वर्षात नवी मुंबईत पक्ष वाढीसाठी आक्रमक पावले उचलली. तर गणेश नाईक यांची ठाण्याच्या संपर्कमंत्रीपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी ठाण्यात भाजप वाढवण्यासाठी पावले उचलली. त्यातूनही शिंदे–नाईक यांच्यात संघर्ष वाढला. या पार्श्र्वभूमीवर दोघांची झालेली भेट युतीच्या दिशेने सकारात्मक पाऊल मानले जाते.

# नांदेडमध्ये एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू

## दोन भावांचा रेल्वे रुळावर, तर आई–वडिलांचा घरात मृतदेह । घातपात की आत्महत्या!


**नांदेड :** बच्या मुदखेड तालुक्यात एक खळबळजनक घटना घडली आहे. इथं एका महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या तालुकाध्यक्षांचं संपूर्ण कुटुंब अवघ्या काही मिनिटांच्या अंतरानं संपलं आहे. आधी तालुकाध्यासह त्यांच्या भावाचा मृतदेह रेल्वे रुळावर आढळला होता. यानंतर अवघ्या काही मिनिटांत घरात आई वडील देखील गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळले आहेत. एकाच कुटुंबातील चारही जणांचा अशाप्रकारे मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

ही घटना नांदेड जिल्ह्या-तील मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावात घडली. इथं एकाच

### मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावातील घटना

कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. दोन भावांनी रेल्वे समोर उडी मारून आत्महत्या केली. तर त्यांच्या आई–वडिलांचा गळफास घेतलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला आहे. आई–वडिलांनी आत्महत्या केली की घातपात झाला? याचा तपास सुरू आहे.





चौघांच्या मृत्यूचं कारण अद्याप स्पष्ट झालं नसून आर्थिक विवंचनेतून हा प्रकार घडला असल्याचा प्राथमिक अंदाज आहे. ही घटना उघडकीस आल्यानंतर जवळा मुरार गावात पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकारी गावात दाखल झाले आहेत.

बजरंग रमेश लखे (वय २२) उमेश रमेश लखे (वय २५), वडील रमेश होनाजी लखे (वय ५१), आई राधाबाई रमेश लखे (वय ४४) असं मृत आढळलेल्या चौघांची नावं आहेत. बजरंग आणि उमेश या दोन सख्ख्या भावांचा मुगट रेल्वे स्थ-ानक परिसरात मृतदेह आढळला. तर वडील रमेश आणि आई राधाबाई लखे यांचा मृतदेह घरात गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. लखे कुटुंबात हे चारच लोक होते. या घटनेनं संपूर्ण कुटुंब संपलं आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, उमेश लखे हा मनसेचा मुदखेडचा माजी तालुका उपाध्यक्ष असल्याची माहिती आहे. सामाजिक कार्यातही उमेशचा सक्रिय सहभाग होता. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली आहे.



मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मुंबई येथे भारताचे माजी पंतप्रधान व भारतरत्न श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन करून पुष्पहार अर्पण केला.

# महिला पोलिसावर लैंगिक अत्याचार

**नागपूर :** नागपूरच्या लकडगंज पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. इथं कायद्याचे रक्षण करणाऱ्या एका महिला पोलीस कर्मचाऱ्यावरच लैंगिक अत्याचार करण्यात आला आहे. आरोपी एवढ्यावरच थांबला नाही. तर त्याने महिला पोलिसाचे आक्षेपार्ह फोटो काढून तिला ब्लॅकमेल केलं आहे.

अश्लील व्हिडीओ व्हायरल करण्याची धमकी देऊन आरोपीनं पीडितेकडून १५ लाख ६० हजार रुपये उकळले आहेत. या प्रकरणी २५ वर्षीय महिला पोलीस अंमलदाराने आरोपीविरोधात फिर्याद दाखल केली आहे. नागपूरच्या लकडगंज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस आरोपीचा शोध घेत आहेत.

विकिन सूर्यभान फुलारे (वय ३०, रा. छत्रपती संभाजीनगर जिल्हा) असं गुन्हा दाखल झालेल्या आरोपीचं नाव आहे. आरोपी विकिन हा आधीच विवाहित असताना-ही त्याने एका नामांकित विवाह नोंदणी संकेतस्थळावर स्वतःची खोटी माहिती भरली. त्याने स्वतःला अविवाहित आणि व्यवसायाने वकील असल्याचं भासवलं. याच खोट्या ओळखीच्या आधारे त्याने पीडित महिला पोलिसाशी संपर्क साधला.

चॅटिंग आणि त्यानंतर व्हिडिओ कॉलच्या माध्यमातून त्याने महिलेचा विश्वास संपादन केला. दोघांची ओळख वाढल्यानंतर आरोपीनं लग्नाचं आमिष दाखवून पीडितेशी भावनिक नातं निर्माण केलं. २८ नोव्हेंबर रोजी आरोपी नागपूरला आला. तिथे त्याने महिलेला एका लॉजवर नेले आणि तिच्यावर अत्याचार केला. या दरम्यान त्याने पीडितेचे काही अश्लील फोटो आणि व्हिडिओ काढले. त्यानंतर त्याने हे फोटो सोशल मीडियावर व्हायरल करण्याची धमकी देऊन त्याने महिलेला मानसिक दबावाखाली आणले. बदनामीच्या धाकाने पीडित महिला दहशतीखाली आली. याचाच फायदा घेत आरोपीने घरगुती अडचणी आणि इतर वैयक्तिक कारणांचे निमित्त सांगून वेळोवेळी महिलेकडून १५ लाख ६० हजार रुपये उकळले. जेव्हा पीडितेने लग्नासाठी तगादा लावला, तेव्हा आरोपीने तिला किन्नरांकडून जिवे मारण्याची आणि समाजातील बदनामी करण्याची धमकी दिली.




KYC कशी पूर्ण कराल
- PAN आधारला लिंक करा
- तुमचा तपशील अपडेट करा (नाव, PAN, जन्मतारीख, मोबाइल, ईमेल, बँक खाते इत्यादी)
- KYC रजिस्ट्रेशन एजन्सीद्वारे आधारसह PAN आणि ई-स्वाक्षरी प्रमाणित करा
- वेबसाइट, मोबाइल ॲप, किंवा म्युचुअल फंड हाउसची शाखा, अथवा CAMS/केफिनटेकसारख्या रजिस्ट्रार आणि ट्रांसफर एजंटद्वारे (RTA) KYC पूर्ण करा.

आजच तुमची KYC पूर्ण करा

**SBI म्युच्युअल फंड द्वारा गुंतवणूकदारांचे शिक्षण आणि जागृतीसाठी एक उपक्रम.**

गुंतवणूकदारांनी केवळ नोंदणीकृत म्युच्युअल फंड्सशीच व्यवहार करावा, ज्यांचे तपशील (https://www.sebi.gov.in) सेबी संकेतस्थळावर 'Intermediaries/Market Infrastructure Institutions' अंतर्गत सत्यापित केले जाऊ शकतात. पत्ता, दूरध्वनी क्रमांक, बँक तपशील इत्यादींमधील बदलांच्या प्रक्रियेसहित, एक-वेळ केवायसी (नो युवर कस्टमर किंवा आपले ग्राहक ओळखा) पूर्ण करण्याच्या प्रक्रियेसाठी, कृपया म्युच्युअल फंड्सच्या संकेतस्थळाचा संदर्भ घ्यावा. गुंतवणूकदार जर नोंदणीकृत मध्यस्थांच्या उत्तरांनी असमाधानी असतील, तर ते आपल्या तक्रारी https://scores.sebi.gov.in वर त्या नोंदणीकृत मध्यस्थांच्या विरुद्ध नोंदवू शकतात. स्कोअर्स (SCORES) आपल्याला सेबीकडे आपल्या तक्रारी ऑनलाईन माध्यमाने नोंदविण्याची आणि त्यानंतर तिची स्थिती पाहण्याची सुविधा देते.

टोल-फ्री: 1800 209 3333 | customer.delight@sbimf.com | भेट द्या: www.sbimf.com | आम्हाला फॉलो करा:

**म्युच्युअल फंडातील गुंतवणूकींना बाजारपेठेतील जोखमी लागू आहेत, योजनेशी संबंधित सर्व दस्तऐवज काळजीपूर्वक वाचावेत.**

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विज्ञान प्रदर्शनात कृष्णा चौगुलेची सुवर्णभरारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** शिक्षण विभाग, पंचायत समिती लातूर व श्री गोदावरीदेवी लाहोटी कन्या शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन दि. २३ व २४ डिसेंबर रोजी उत्साहात पार पडले.

या प्रदर्शनात स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, लातूर येथील इयत्ता सातवीतील चि. कृष्णा सोमनाथ चौगुले याने दिव्यांग गटातून प्रथम क्रमांक मिळवत आपल्या गुणवत्ता व जिद्दीचा ठसा उमटविण्याचे कार्य केलेले आहे. कृष्णा याने जलविद्युत प्रकल्प या विषयावर सादर केलेला प्रयोग सर्वांचे लक्ष वेधून घेणारा ठरला.

पाण्याच्या ऊर्जेपासून वीज निर्मिती कशी करता येते, हे त्याने सोपी, शास्त्रीय व प्रात्यक्षिक पद्धतीने मांडले. त्याच्या कल्पक सादरीकरणामुळे परीक्षकांनी विशेष प्रशंसा केली. या यशामागे मार्गदर्शक शिक्षिका शितल वाडीकर यांचे मार्गदर्शन लाभले.

या उल्लेखनीय कामगिरीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी सूर्यवंशी, माधव गीते, सोनाली पाटील, शुभांगी बेरुळे, ज्योती मठपती, सर्व शिक्षकवृंद व पालकांनी कृष्णा चौगुले याचे अभिनंदन करून जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनासाठी शुभेच्छांचा वर्षाव केला.



# यशस्वीतेचे कोणतेही मोजमाप नसते : देशमुख

## श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** मानवी जीवनात यशस्वीतेचे कोणतेही मोजमाप नसते. तसेच कुठल्याही चांगल्या कामाला उशीर झालेला नसतो, असे प्रतिपादन माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी केले.

लातूर येथील अभिनव मानव विकास संस्थाद्वारा संचालित श्रीकिशन सोमाणी विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाटन गुरुवारी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून आपले विचार व्यक्त करत होते. याप्रसंगी व्यासपीठावर अभिनव मानव विकास संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, उपाध्यक्ष प्रकाश कासट, विवेक रेड्डी, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, कोषाध्यक्ष जयेश बजाज, सहसचिव सूर्यप्रकाश धूत, सुभाष कासले, संचालक हुकूमचंद कलंत्री, शांतीलाल कुचेरिया, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती प्रतिमेचे पूजन करण्यात आले. हे वर्ष माजी मंत्री




दिलीपराव देशमुख यांचे अमृत महोत्सवी वर्ष आहे. त्यानिमित्त संस्थेच्या वतीने त्यांचा ताम्रपटावरील सन्मानचिन्ह, हिराबाई बडोदेकरांवरील पुस्तक, विद्यालयातील विद्यार्थ्याने रेखाटलेले त्यांचे छायाचित्र देऊन सन्मान करण्यात आला.

दयानंद सभागृहात आपण आतापर्यंत अनेक कार्यक्रमांना अध्यक्ष, प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती लावली असली तरी आजच्या या कार्यक्रमाची अनुभूती अतिशय वेगळी आहे, असे सांगून दिलीपराव देशमुख म्हणाले की, श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा चढता आलेख सर्वांनाच प्रेरणा देऊन जाणारा आहे. या विद्यालयात विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणासोबतच त्यांच्या सुप्त कलागुणांना जो वाव दिला जातो, तो विद्यार्थ्यांना यशस्वी करण्याबरोबरच एक चांगले नागरिक बनविण्यासाठी अतिशय उपयुक्त आहे. आजचे युग माहितीचे युग आहे. एका क्लिकवर जगातील सगळी माहिती उपलब्ध होते. पण कोणत्याही गोष्टीसाठी सामान्य ज्ञान, कॉमन सेन्स अतिशय आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. ज्याप्रमाणे विमानाचे टेक ऑफ आणि लँडिंग एखादा सफल पायलट व्यवस्थितरीत्या करत असतो, त्याप्रमाणे विद्यालयाच्या मुख्याध्यापकांचीही जबाबदारी असते. संस्था चालकांनी कितीही सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या तरी मुख्याध्यापकांकडून त्या कशा प्रकारे कार्यान्वित केल्या जातात ते खूपच महत्वाचे असते. जन्माला आलेल्या प्रत्येकाला कधी ना कधी हे जग सोडून जायचे आहे. जाताना आपण काय सोडून जातोय,? याचे भान प्रत्येकाला असणे गरजेचे आहे. आपल्या पाठीमागे सुसंस्कृत समाज सोडता आला पाहिजे, या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. या पृथ्वीतलावर आपण केवळ प्रवासी म्हणून आलो आहोत. जाताना पृथ्वीची कचरा कुंडी करू नका, असा मोलाचा सल्ला त्यांनी यावेळी दिला. संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा यांनी स्वागतपर मनोगतात दिलीपराव देशमुख हे सिद्धहस्त व्यक्तिमत्वाचे धनी असल्याचे सांगितले. त्यांच्या परीस स्पर्शाने संस्थेचे सोने झाल्याचे गौरवपर उदगार त्यांनी काढले.

संस्थेच्या भावी उपक्रमांची माहितीही त्यांनी दिली. शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर यांनी दिलीपराव देशमुख हे अनेकदा काहीही न बोलता खूप काही बोलून जातात असे मत व्यक्त करून लातूरच्या जडणघडणीत अनेकांचा हातभार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक रमाकांत स्वामी यांनी केले. सूत्रसंचालन चक्षुपाल कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन सचिव कमलकिशोर अग्रवाल यांनी केले.

याप्रसंगी आबासाहेब पाटील सेलूकर, संभाजी सूळ, लक्ष्मण मोरे यांच्यासह पालकवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या विविध कलागुणांचे उत्कृष्ट प्रदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली.



## आ. देशमुखांचा नागरिकांशी संवाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** गुरुवार दि. २५ डिसेंबर २०२५ राज्याचे माजी मंत्री तथा आ. अमित देशमुख यांनी गुरुवार दि. २५ डिसेंबर रोजी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहरासह जिल्हाभरातून आलेले विविध संस्था तसेच संघटनाचे पदाधिकारी, काँग्रेस पक्ष पदाधिकारी, नागरिक, महिला भगिनी यांच्या भेटी घेत त्यांच्याशी संवाद साधला, त्यांच्या अडीअडचणी समस्या समजून घेतल्या तसेच त्यांची निवेदने व निमंत्रनाचा स्वीकार करून संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी सूचना केल्या.

यासोबतच आगामी स्थानिक स्वराज्य संस्था, लातूर शहर महानगर पालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ अनुषंगाने काँग्रेस पक्षाचे इच्छुक उमेदवार, पदाधिकारी यांच्याशी निवडणुक संदर्भाने सविस्तर चर्चा केली. यावेळी ट्वेंटीवन शुगरचे व्हा.विजय देशमुख, लातूर शहर महानगरपालिकेचे माजी उपमहापौर कैलास कांबळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे लातूर जिल्हाध्यक्ष दादा करपे, वेंकटेश पुरी, ओमकार मुळे, प्रा. शिवाजी शिंदे, सागर हुलपले, आकाश भगत, रेखाताई पुट्टेवाड, आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, महिला भगिनी उपस्थित होत्या.

# विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रश्नांवर तातडीने उपाययोजना करा

**अभाविपची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी । अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा**



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** जिल्ह्यातील तसेच मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध शैक्षणिक समस्यांबाबत अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी यांना निवेदन सादर करण्यात आले. शिक्षण प्रक्रियेमधील अडथळे, परीक्षा व निकालातील त्रुटी, शिष्यवृत्ती, वसतिगृह, आरोग्य शिक्षण आणि तांत्रिक शिक्षणातील अडचणी तातडीने दूर करून विद्यार्थ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

अभाविपने मांडलेल्या मागण्यांमध्ये अतिवृष्टीग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षा शुल्क माफ करणे व शुल्कात कपात, मुलींच्या मोफत शिक्षण योजनेची सर्वत्र प्रभावी अंमलबजावणी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठातील प्रवेश, परीक्षा आणि निकाल व्यवस्थेतील उणिवा दूर करणे, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठातील रिक्त प्राध्यापक पदे तातडीने भरणे, स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठातील प्रलंबित भरती पूर्ण करणे या महत्त्वाच्या मुद्द्यांचा समावेश आहे.

तसेच महाविद्यालयांमध्ये डिजिटल सुविधांचा अभाव दूर करून अत्याधुनिक साधनसामग्री उपलब्ध करणे, प्रलंबित शिष्यवृत्ती तत्काळ विद्यार्थ्यांच्या खात्यात जमा करणे, शासकीय वसतिगृहांचे नूतनीकरण करण्याबरोबरच खपेंशिपी व ठशीळवशपीं ऊेल्ीी यांचा स्टायपेंड वाढविणे, आयटीआय विद्यार्थ्यांना वेळेत भत्ता देणे व प्रात्यक्षिकांसाठी आवश्यक उपकरणे उपलब्ध करून देणे, नर्सिंग विद्यार्थ्यांना रोजगारात समान संधी देणे, चऋडण उदगीर येथील प्रलंबित भरती पूर्ण करणे तसेच लातूर शहरातील ट्युशन परिसरात वाढत असलेल्या अमली पदार्थांच्या वापरावर आणि अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई करण्याची मागणीही करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या या सर्व मागण्यांवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अन्यथा विद्यार्थ्यांच्या तीव्र रोषास प्रशासनाने सामोरे जावे लागेल, असा इशाराही अभाविपने दिला.

यावेळी उपस्थित महानगर सहमंत्री प्रतीक बारबोले, शुभम क्षीरसागर, पूर्व नगर मंत्री दीपक यादव, प्रथमेश कस्तुरे यांच्यासह अभाविपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# भाजपाच्या विचारावर विश्वास ठेवत नगरसेवकांचा प्रवेश : आ. निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** काँग्रेसचे नगरसेवक रविशंकर जाधव व पुनित पाटील यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाभिमुख व कल्याणकारी कार्यावर विश्वास ठेवत भाजपात प्रवेश घेतला. विकासाला पाठबळ देण्यासाठी भविष्यातही अनेकजण पक्षात येण्यास इच्छुक असल्याचे मत लातूर शहर निवडणूक प्रमुख माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी यावेळी व्यक्त केले.

गुरुवारी (दि. २५) आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, आ.अभिमन्यू पवार, आ.रमेशअप्पा कराड, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेशाचा हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन




करताना आ. निलंगेकर बोलत होते. आ. संभाजीराव पाटील म्हणाले, मागील. ११ वर्षात देशात व राज्यात होत असलेली विकासकामे जनतेने पाहिली आहेत. भाजपाच्या विचारावरील सरकार देशात असून या पक्षात देशहिताला प्राधान्य दिले जाते. या काळात देशाची विकासाच्या मार्गावर घोडदौड सुरू आहे. त्यामुळे इतर पक्षात नेते व कार्यकर्त्यांनाही आता भवितव्य राहिलेले नाही. यामुळेच भाजपात येणाऱ्यांची संख्या वाढली असल्याचे आ.निलंगेकर म्हणाले.

रविशंकर जाधव व पुनीत पाटील यांच्या समवेत यांच्यासोबत सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांत सोळुंके, स्वस्त धान्य दुकान असोसिएशन अध्यक्ष हंसराज जाधव, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष अशोक देडे तसेच गनिमीकावा संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मीकांत जोगदंड, धर्मेंद्र चौहान, जितेंद्र चौहान, ऋषी पाटील यांनीही यावेळी भाजपचा झेंडा हाती घेतला.

या पक्षप्रवेशामुळे लातूर शहरातील भारतीय जनता पक्षाचे संघटन अधिक बळकट झाले असून आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्र्वभूमीवर भाजपची वाटचाल अधिक मजबूत झाली आहे.

या पक्षप्रवेश सोहळ्याला माजी जिल्हाध्यक्ष शैलेश लाहोटी,देविदास काळे, शैलेश गोजमगुंडे, प्रेरणाताई होनराव, सुधीर धुत्तेकर, सरचिटणीस संजय गिर, रागिणीताई यादव, प्रविण कस्तुरे, निखिल गायकवाड, निवडणूक कार्यालय प्रमुख तुकाराम गोरे यांच्यासह पक्षाचे मंडळ अध्यक्ष, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे चाकूरकरांना श्रध्दांजली

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेतर्फे भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा दिवंगत माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांना भावपूर्ण श्रध्दांजली वाहण्यात आली.

लातूर जिल्हा न्यायालयात पार पडलेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या अध्यक्षा ॲड. जयश्रीताई पाटील ह्या होत्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी सर्व उपस्थित महिला विधिज्ञांनी स्व. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून विनम्र आदरांजली वाहिली. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना ॲड. जयश्रीताई पाटील यांनी स्व. चाकूरकरांच्या जीवन




कार्यावर प्रकाश टाकला. राजकारणातील एक ऋषीतुल्य व्यक्तीमत्व असणारे शिवराज पाटील चाकूरकर एक निष्कलंक चारित्र्याचे महान नेते होते. त्यांचे कार्य कायम आपणा सर्वांना प्रेरणा देणारे आहे. २०१४ मध्ये ते महाराष्ट्र फेडरेशन ऑफ वुमन लॉयर्स संघटनेच्या कार्यक्रमासाठी दयानंद सभागृहात आले होते. त्यावेळी त्यांनी महिला विधिज्ञ संघटनेच्या कार्याचे कौतुकही केले होते. त्यांच्याकडून मिळालेली कौतुक व अभिनंदनाची पाठिवरील थाप महिला विधिज्ञांना कायम प्रेरणा देणारी असल्याची भावना जयश्रीताईंनी व्यक्त केली.

या प्रसंगी महिला वकील ॲड. पल्लवी कुलकर्णी, ॲड. प्रतिभा कुलकर्णी, ॲड. अरुणा वाघमारे, ॲड.ड. वसुधा नाळापुरे, ॲड.बिडवे, ॲड. बोरा, ॲड.गायत्री, ॲड.प्राजक्ता, ॲड. रेश्मा, ॲड. कविता, ॲड.कोमल आदींची उपस्थिती होती. या सर्व सदस्यांनी विनम्र अभिवादन करून चाकूरकरांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

# राज्याची प्रगती साधण्याचे काम एकजुटीने करू : कव्हेकर

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** शेखमियाँ साहेब दर्गा हे सर्व धर्मियांचे आदराचे भक्तीचे असे जागरूक श्रध्दास्थान आहे. त्यामुळे आम्ही कोणताही जातीय भेदभाव न करता समाजाची निष्काम, निस्वार्थीपणे सेवा करीत आहोत. भगवत् गीता, कुराण हेच आपल्याला जीवनामध्ये चांगले काम करण्याची सद्बुध्दी देतात. हेच आध्यात्मिक ग्रंथ आपले खरे आदर्श आहेत. त्यामुळे ईश्वरभक्ती आणि अधात्म यांना जीवनाची गुरूकिल्ली समजून गाव, जिल्हा आणि राज्याची प्रगती साधण्याचे काम आपण एकजुटीने करू, असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गुजरात व गोवा राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.



यावेळी ते कव्हा येथील जामा मस्जिदीच्या वजूखाना व स्वच्छतगृहाच्या भूमिपूजन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी या कार्यक्रमाला हाजी रज्जाक नाना अत्तरवाले, शेख पाशाभाई, भानुदास घार, सुभाषअप्पा सुलगुडले, गोपाळ वांगे, नेताजी मस्के, रसूलभाई पठाण, रसूल सय्यद, शेखसाब इंजिनियर, तस्लिम सय्यद, सालार पठाण, सादीक पठाण, हामिद सय्यद, नाजम शेख, खाजा सय्यद, लायक पाशा पठाण, आसिफ पठाण, मुन्ना सय्यद, फारूक सय्यद यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, देशातील जनतेने कर्तबगार, व्हिजनरी पंतप्रधान मा.ना.नरेंद्र मोदी यांना तिसर्यांदा पंतप्रधान बनवले. हिंदू ही एक जात नसून तो एक विचार आहे.

या विचारातून त्रिलोकाचे कल्याण करण्याचे काम केले जाते. अशा विचारातून गेल्या ११ वर्षांच्या कार्यकाळात हिंदू बांधवांना जो न्याय दिला तोच न्याय मुस्लीम समाज व समाजातील इतर लोकांना देण्याचे काम मोदीजींनी केलेले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना, ज्येष्ठ नागरिकांना पेंशन व ८० टक्के लोकांना मोफत धान्य देऊन सर्वांना समान न्याय देण्याचे काम केलेले आहे. कश्मिरमध्ये ३७० कलम हटवून कश्मिरच्या विकासाला गती देण्याचे काम केलेले आहे, असे मतही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रमुख मान्यवरांचा ग्रामस्थांच्यावतीने सत्कार करण्यात आला. तसेच कव्हा गावच्या विकासासाठी जामा मस्जिदीच्या वजूखाना व स्वच्छतगृहाच्या भूमिपूजन माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व इतर मान्यवरांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी या कार्यक्रमाला कव्हा व परिसरातील नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पंतप्रधान वाजपेयींनी नवभारताची मुहूर्तमेढ रोवली : प्रा. डॉ. डोंगरगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २५ डिसेंबर :** भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी त्यांच्या संपूर्ण जीवनामध्ये सामाजिक, राजकीय आणि आर्थिक धोरणांनी देशाचा विकास घडवून आणला त्यामुळे खऱ्या अर्थाने आधुनिक नवभारताची मूर्तमेढ त्यांनी रोवली असे प्रतिपादन विज्ञान शाखा समन्वयक तथा भौतिकशास्त्र विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सिद्राम डोंगरगे यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली यावेळी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे, प्रोफेसर डॉ. संजय गवई, डॉ.



अरविंद पाटील, डॉ. मनोहर चपळे, डॉ. अविनाश हेडावू आणि डॉ. बसवेश्वर बेंद्रे यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. बसवेश्वर बेंद्रे आणि डॉ. अविनाश हेडाऊ यांनीही अटल बिहारी वाजपेयी यांच्या तंत्रज्ञानाच्या योगदानावर भाष्य केले. अध्यक्षीय प्रोफेसर डॉ. आनंद शेवाळे यांनी केला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राम पाटील, योगीराज माकणे आणि अजय गायकवाड यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...

### क्रांतिज्योती विद्यालय-मराठी माध्यम' १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार




**छत्रपती संभाजीनगर :** मराठी शाळांच्या अस्तित्वावर भाष्य करणारा बहुप्रतिक्षित चित्रपट 'क्रांतिज्योती विद्यालय - मराठी माध्यम' १ जानेवारी २०२६ रोजी प्रदर्शित होणार आहे. सचिन खेडेकर मुख्याध्यापकाच्या भूमिकेत झळकणार असून, अमेय वाघ, सिद्धार्थ चांदेकर, क्षिती जोग, पुष्कराज चिरपुटकर, कादंबरी कदम, हरीश दुधाडे आणि मराठी चित्रपटात पदार्पण करणारी प्राजक्ता कोळी अशी मजबूत स्टारकास्ट चित्रपटात आहे. अभिनेत्री निर्मिती सावंतच्या भूमिकेबाबतही उत्सुकता आहे. चलचित्र मंडळी निर्मित या चित्रपटाचे लेखन-दिग्दर्शन हेमंत ढोमे यांचे असून, क्षिती जोग निर्माती आहे. अलिबाग येथील ज्या शाळेत चित्रीकरण झाले, त्याच ठिकाणी ट्रेलरचे अनावरण करण्यात आले. बंद पडत चाललेल्या मराठी शाळेची कथा, माजी विद्यार्थ्यांचे पुनर्मिलन आणि शाळा वाचवण्यासाठीचा प्रयत्न या चित्रपटातून भावनिक व मनोरंजक पद्धतीने मांडण्यात आला आहे. मराठी भाषा व शिक्षणाच्या महत्त्वावर प्रभावी भाष्य करणारा हा चित्रपट प्रेक्षकांसाठी नॉस्टॅल्जिक अनुभव देणारा ठरणार आहे.

### किसान दिनी शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा गौरव

**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय शेतकरी दिन (किसान दिवस) निमित्त झी टीव्हीवरील लोकप्रिय मालिकांतील कलाकारांनी शेतकऱ्यांच्या योगदानावर फोकस करत त्यांना आवश्यक तो आदर, कृतज्ञता आणि संस्थात्मक पाठिंबा मिळावा, अशी स्पष्ट भूमिका मांडली. 'गंगा माई की बेटियां'मधील शुभांगी लाटकर, 'लक्ष्मी निवास'मधील राजेंद्र चावला, 'जगद्धात्री'मधील गीता त्यागी आणि 'वसुधा'मधील परिणिता बोरठाकूर यांनी शेतकऱ्यांच्या अथक परिश्रमांचा गौरव केला. या प्रसंगी अभिनेत्री शुभांगी लाटकर म्हणाल्या, या किसान दिनी मी प्रत्येक शेतकऱ्याला सलाम करते. पहाटे उठून हातांनी आणि मनाने मेहनत करत देशाला अन्नपुरवठा करणाऱ्या शेतकऱ्यांचे ऋण अमूल्य आहे. 'गंगा माई की बेटियां' मालिकेत मी मूल्याधारित आईची भूमिका साकारते; त्यामुळे जमिनीची काळजी घेणाऱ्या लोकांचे आपल्या समाजावर किती मोठे योगदान आहे, याची प्रकर्षाने जाणीव होते. त्यांची ताकद, त्याग आणि जिद्द हीच भारताच्या विकासाची मजबूत पायाभरणी आहे.

### खऱ्या अंगूरी भाबी परत - शिल्पा शिंदेंचे पुनरागमन

**छत्रपती संभाजीनगर :** एण्ड टीव्ही प्रेक्षकांसाठी नॉस्टॅल्जिया आणि नव्या एनर्जीचा स्ट्रॅटेजिक ब्लेंड सादर करत आहे. २२ डिसेंबरपासून एण्ड टीव्ही आणि हिंदी नएए५ वर सुरू होणाऱ्या 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये लोकप्रिय अंगूरी भाबीच्या भूमिकेत शिल्पा शिंदे यांचे बहुप्रतिक्षित कमबॅक होत आहे. जवळपास दशकानंतर घराघरात लोकप्रिय ठरलेल्या भूमिकेसह त्यांचे पुनरागमन होत असून, नुकत्याच रिलीज झालेल्या प्रोमोमुळे चाहत्यांमध्ये मोठी भावनिक आणि ब्रँड-रिकॉल व्हॅल्यू निर्माण झाली आहे. रिलीज करण्यात आलेल्या प्रोमोमध्ये शिल्पा शिंदेंच्या कमबॅकसोबत 'भाबीजी घर पर है २.०'च्या नव्या विश्र्वाची डायनॅमिक झलक पाहायला मिळते. कथानकात अनिता भाबी (विदिशा श्रीवास्तव), विभुती नारायण मिश्रा (आसिफ शेख) आणि मनमोहन तिवारी (रोहिताश्र्व गौड) हे रहस्यमय घुंघटगंज शहरात प्रवेश करतात. येथे परंपरा, गूढता आणि विनोद यांचे संतुलित कॉम्बिनेशन प्रेक्षकांना एक फ्रेश कंटेंट एक्सपीरियन्स देणार आहे.

### ओला इलेक्ट्रिकने हायपरसर्व्हिसचा विस्तार

**छत्रपती संभाजीनगर :** पात्र ग्राहकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय त्याच दिवशी सेवा हमी* देण्यासाठी डिझाइन केलेले समर्पित हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच करून ओलाने आज त्यांच्या हायपरसर्व्हिस उपक्रमाचा विस्तार करण्याची घोषणा केली. या विस्ताराचा एक भाग म्हणून, ओला त्यांच्या विद्यमान सेवा केंद्रांना हळूहळू हायपरसर्व्हिस सेंटर्समध्ये अपग्रेड करेल, ज्याची सुरुवात बेंगळुरूपासून होईल. पहिले हायपरसर्व्हिस सेंटर आता बेंगळुरूच्या इंदिरानगरमध्ये कार्यरत आहे. हायपरसर्व्हिस सेंटरची रचना सेवा अनुभव मूलभूतपणे सुलभ आणि वेगवान करण्यासाठी केली गेली आहे. ग्राहक आता त्यांच्या वाहनांची सेवा एकाच दिवसात करू शकतात, कोणतेही अतिरिक्त पैसे न देता, आणि शेवटी-ते-शेवटी पूर्णपणे डिजिटल आणि पारदर्शक सेवा प्रवास अनुभवू शकतात.

### खुशी यादवला वाचवण्यासाठी पालकांची मदतीची आवाहन

**मुंबई :** २१ महिन्यांच्या चिमुकली खुशी यादवच्या पालकांनी आपल्या मुलीचे प्राण वाचवण्यासाठी जनतेकडे तातडीची मदतीची विनंती केली आहे. खुशीला स्पायनल मस्क्युलर अॅट्रॉफी टाइप-२ हा दुर्मिळ आणि जीवघेणा आनुवंशिक आजार असल्याचे निदान झाले आहे. हा आजार हळूहळू स्नायू कमकुवत करतो आणि वेळेवर उपचार न झाल्यास अल्पावधीत जीवघेणा ठरू शकतो. फेब्रुवारी २०२४ मध्ये जन्मलेली खुशी - ज्याच्या नावाचा अर्थच आनंद असा होतो - आपल्या कुटुंबात प्रचंड आनंद घेऊन आली होती. मात्र आज ती अशा आजाराशी लढत आहे, ज्यामुळे तिला उभे राहणे किंवा चालणे शक्य राहिलेले नाही. तिच्या घोट्यांतील व गुडघ्यांतील रिफ्लेक्सेस नष्ट झाले आहेत, तिला स्वतःहून बसणे कठीण जाते आणि वारंवार दीर्घकालीन श्र्वसन संसर्ग होतो, ज्यासाठी नेब्युलायझेशन करावे लागते.

### डब्ल्यूएमजी फाउंडेशन सोबत सामंजस्य करार (एमओयू)

**बेंगळुरू :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज कर्नाटकातील बंडीपूर व्याघ्र प्रकल्पातील ऱ्हास झालेल्या वनपरिसराच्या पुनरुज्जीवनासाठी डब्ल्यूएमजी फाउंडेशनसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला. या हस्तक्षेपाचा उद्देश आक्रमक लँटाना कॅमारा तण काढून टाकून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करणे आणि पर्यावरणीय असमतोल दूर करणे हा आहे. हा एमओयू टोयोटा किर्लोस्कर मोटरचे कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटीचे जनरल मॅनेजर श्री. रोशन आर. यांनी डब्ल्यूएमजी फाउंडेशनच्या प्रमुख सुश्री अपूर्वा अंगडी व्ही. एम. यांच्या उपस्थितीत औपचारिकरित्या अदलाबदल केला. बंडीपूर व्याघ्र प्रकल्पावर लँटाना कॅमारा* या आक्रमक प्रजातीचा दीर्घकाळापासून परिणाम होत आहे. सध्या या तणाने प्रकल्पाच्या बफर आणि मुख्य क्षेत्रांपैकी सुमारे ५०-६० टक्के भाग व्यापलेला आहे. या प्रादुर्भावामुळे स्थानिक गवतवर्गीय वनस्पती दडपल्या गेल्या असून, शाकाहारी प्राण्यांसाठी चाऱ्याची उपलब्धता कमी झाली आहे, वन्यजीव मार्ग तुटले आहेत आणि वाघांचे मानवी वस्त्यांकडे स्थलांतर वाढले आहे.

# उपजिल्हाधिकारी कडवकर यांना गौरवपूर्ण निरोप

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.२५ डिसेंबर :** महसूल प्रशासनातील अभ्यासू, कर्तव्यदक्ष व लोकाभिमुख अधिकारी म्हणून ओळख असलेले कन्नडचे तत्कालीन तहसीलदार विद्याचरण कडवकर यांची धाराशिव येथे निवासी उपजिल्हाधिकारी म्हणून पदोन्नती झाल्याबद्दल कन्नड येथे त्यांचा निरोप व सत्कार समारंभ उत्साहात पार पडला.

हा कार्यक्रम प्रभारी तहसीलदार दिलीपकुमार सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली, तर महसूल संघटनेचे राज्यकार्याध्यक्ष अनिल सूर्यवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. २५) दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आला. तलाठी संघटना व महसूल कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कन्नड तालुक्यातील सुमारे तीन वर्षांच्या कार्यकाळात उपजिल्हाधिकारी कडवकर यांनी पारदर्शक, गतिमान व लोककेंद्रित प्रशासनाचा आदर्श निर्माण केला. महसूल विभागातील प्रलंबित प्रश्न मार्गी लावणे, शासकीय योजनांची प्रभावी अंमलबजावणी, तक्रार निवारणात तत्परता तसेच आपत्ती व्यवस्थापनात त्यांनी दाखवलेली दक्षता विशेष उल्लेखनीय ठरली. अधिकारी-कर्मचारी यांच्यात समन्वय राखत नागरिकांचा विश्वास संपादन करण्यात त्यांनी यश मिळवले, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमास महसूल संघटनेचे जिल्हाध्यक्ष सतीश भदाने, तलाठी दिपक एरंडे, बाळासाहेब घटे, नितीन मगरे, रमेश सूर्यवंशी, वनपरिक्षेत्र अधिकारी प्रा. शिवाजी टोम्पे, शिवाजी थेटे, प्रकाश बोरसे, कृष्णा इंटरनॅशनलच्या वसुंधरा पवार यांच्यासह महसूल अधिकारी, कर्मचारी व विविध




क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना उपजिल्हाधिकारी कडवकर यांनी कन्नडवासीयांचे ऋण व्यक्त करत, कन्नड तालुक्यात काम करताना मिळालेला सहकार्याचा अनुभव सदैव स्मरणात राहील, असे मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण दाभाडे यांनी केले.




**छत्रपती संभाजीनगर :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी भारताचे माजी पंतप्रधान स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## शालेय समिती शिक्षण तज्ञ सोहणी यांची निवड

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.२५ डिसेंबर:** सोमवार रोजी जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथे पालक सभा संपन्न झाली. पालक सभेतून शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन करण्यात आली. त्यामध्ये शालेय समितीची निवड करण्यात आली. अध्यक्ष व सर्व शाळेय समितीने शालेय समिती मध्ये शिक्षण तज्ञ म्हणून कृषीभूषण अरूण सोहणी यांची निवड करण्यात आली.



त्यांच्या निवडीबद्दल अध्यक्ष सुनील ठोंबरे, उपाध्यक्ष भारती गायकवाड, सर्व सदस्य पदी ललित पंडित, रुपाली समाधान पाटील, उज्वला शांताराम ढगे, वाल्मीक चव्हाण, भिला राठोड, अनिल शिंदे, अनिता पोपट कोळी, कृष्णा जुनघरे पाटील, रामेश्वर शिरसाट, भास्कर चौधरी,स्थानिक प्राधिकरण सदस्य नगरसेवक नगरपंचायत, भावेश जाधव, चंचल राठोड व दादाराव राठोड, सुखदेव पाटील, भास्कर चौधरी, शिवाजी नवले, संतोष भारद्वाज, विद्याधर बागुल, संगीता सोनवणे, तुकाराम पायघन, जया वाघ, वैजनाथ सावळे, शिवराम आगे, सचिन ढगे, राजेंद्र उंबरकर यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## 'टेडएक्स एमजीएमयु २०२६' चे एमजीएममध्ये आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या वतीने शनिवार, दि. ३ जानेवारी २०२६ रोजी विद्यापीठाच्या रुक्मिणी सभागृहात 'टेडएक्स एमजीएमयु २०२६' या ज्ञान-विचार मंचाचे आयोजन करण्यात आले आहे. पूर्णतः विद्यार्थ्यांच्या नेतृत्वाखाली साकारलेला हा उपक्रम 'इंबर : वन स्पार्क, एंडलेस पॉसिबिलिटीज' या संकल्पनेवर आधारित असून नवोन्मेष, नेतृत्व आणि सामाजिक परिणाम या त्रिसूत्रीवर केंद्रित आहे.

या व्यासपीठावर एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, पद्मश्री प्रा. जी. डी. यादव, दिग्गज गोल्फपटू अमित लुथरा, उद्योजक शेफ पूनम कौर बिंद्रा, बिझनेस लीडर कल्पेन शुक्ला, शेतकरी-उद्योजक सिद्धेश साकोरे, सामाजिक कार्यकर्त्या दीक्षा दिंडे, शिक्षणतज्ज्ञ अमोल सुतार, सिस्टिम्स थिंकर नैना साहनी आणि अवकाश तज्ज्ञ डॉ. शिरीष रावण हे विविध क्षेत्रांतील मान्यवर आपले प्रेरणादायी विचार मांडणार आहेत.

या टेडएक्सद्वारे तंत्रज्ञान, उद्योजकता, पर्यावरण, सामाजिक समावेशन आणि नेतृत्व-विकास या विषयांवर उच्च-प्रभावी संवाद साधला जाणार आहे. सहभागासाठी tedx.mgmu.ac.in या संकेतस्थळावर नोंदणी करता येईल. अधिकाधिक विद्यार्थी, संशोधक आणि नागरिकांनी या विचारमंथनात सहभागी व्हावे, असे आवाहन लायसेन्सी प्रा. डॉ. विजया मुसांडे यांनी केले आहे.

## ओला इलेक्ट्रिकने हायपरसर्व्हिसचा विस्तार

**छत्रपती संभाजीनगर :** पात्र ग्राहकांना कोणत्याही अतिरिक्त खर्चाशिवाय त्याच दिवशी सेवा हमी देण्यासाठी डिझाइन केलेले समर्पित हायपरसर्व्हिस सेंटर्स लाँच करून ओलाने आज त्यांच्या हायपरसर्व्हिस उपक्रमाचा विस्तार करण्याची घोषणा केली. या विस्ताराचा एक भाग म्हणून, ओला त्यांच्या विद्यमान सेवा केंद्रांना हळूहळू हायपरसर्व्हिस सेंटर्समध्ये अपग्रेड करेल, ज्याची सुरुवात बेंगळुरूपासून होईल. पहिले हायपरसर्व्हिस सेंटर आता बेंगळुरूच्या इंदिरानगरमध्ये कार्यरत आहे. हायपरसर्व्हिस सेंटरची रचना सेवा अनुभव मूलभूतपणे सुलभ आणि वेगवान करण्यासाठी केली गेली आहे. ग्राहक आता त्यांच्या वाहनांची सेवा एकाच दिवसात करू शकतात, कोणतेही अतिरिक्त पैसे न देता, आणि शेवटी-ते-शेवटी पूर्णपणे डिजिटल आणि पारदर्शक सेवा प्रवास अनुभवू शकतात.

## घोसला सांडव्यावर कारवाई करा

**■ पुष्पाताई काळे यांची आ. संजनाताई जाधव यांच्याकडे मागणी**

**तभा.वृत्तसेवा**

**सोयगाव, दि.२५ डिसेंबर:** सोयगाव तालुक्यातील घोस-



ला येथील सिंचन तलावाच्या सांडव्याची दिशा चुकीची असल्याने परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतजमिनी खरडून वाहून गेल्या असून,गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर शेतीचे नुकसान होत आहे.या गंभीर समस्येमुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत.या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून सदर सिंचन तलावाच्या सांडव्याची दिशा बदलणे अत्यावश्यक असून,यासाठी सिंचन विभाग,जिल्हा परिषद यांच्या मार्फत प्रस्ताव तयार करण्यात येत आहे. या कामासाठी अंदाजे २ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे हा निधी जिल्हा नियोजन राखीव आपत्कालीन निधीतून मंजूर करण्यात यावा,अशी मागणी जिल्हाधिकारी यांच्याकडे करण्यासाठी पुढाकार घेण्यात आला आहे.

या संदर्भात कन्नड-सोयगाव विधानसभा मतदारसंघाच्या आमदार संजनाताई जाधव यांची पुष्पाताई काळे यांनी भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.यावेळी आमदार जाधव यांनी या प्रश्नाची दखल घेत आठ दिवसांच्या आत पाठपुरावा करून सदरील कामासाठी निधी मंजूर करून घेऊन काम जलद गतीने पूर्ण करण्याचे आश्र्वासन दिले. या प्रसंगी रुचिका घोगरे (उप-अभियंता, लघु सिंचन विभाग, सिल्लोड) उपस्थित होते. ही माहिती पुष्पाताई प्रकाश काळे जिल्हाध्यक्षा,भाजपा महिला मोर्चा, छत्रपती संभाजीनगर उत्तर ग्रामीण व माजी सदस्या, जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर यांनी दिली.

# कर्मवीर काकासाहेब विद्यालयात तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि.२५ डिसेंबर :** महाराष्ट्र शासन व पंचायत समिती शिक्षण विभाग, कन्नड यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील ५३ वे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन कर्मवीर काकासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालय, कन्नड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक व माध्यमिक स्तरावरील ६५ शाळांनी सहभाग नोंदवला.

विज्ञान प्रदर्शनाचे उद्घाटन जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव, पंचायत समितीचे विशेषतज्ञ संदीप कुलकर्णी, प्रशांत अहिरराव व आसिफ शेख यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

बक्षीस वितरण समारंभात पंचायत समिती कन्नडचे गटशिक्षणाधिकारी सभाहत मोहम्मद, शिक्षण विस्तार अधिकारी व




केंद्रप्रमुख बाजीराव ताठे, मुख्याध्यापक रवींद्र पाटील, पर्यवेक्षक गणेश डव्हारे यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी विज्ञान शिक्षक संतोष परदेशी उपस्थित होते. याप्रसंगी गटशिक्षणाधिकारी सभाहत मोहम्मद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी प्रयोगशील व चिकित्सक दृष्टिकोन ठेवला तर जीवनात सकारात्मक व मूलभूत बदल घडवता येतात. विज्ञान प्रदर्शनातून हीच सर्जनशीलता विकसित होते, त्यामुळे विद्यार्थ्यांनी अशा उपक्रमांमध्ये सातत्याने सहभाग घ्यावा. विज्ञान प्रदर्शनासाठी अन्न, आरोग्य व स्वच्छता, वाहतूक व दळणवळण, नैसर्गिक शेती, आपत्ती व्यवस्थापन, गणितीय मॉडेलिंग व संगणकीय विचार, कचरा व्यवस्थापन तसेच संसाधन व्यवस्थापन असे विषय देण्यात आले होते. प्राथमिक, माध्यमिक, दिव्यांग विद्यार्थी, प्राथमिक व माध्यमिक शिक्षक तसेच प्रयोगशाळा परिचर असे स्वतंत्र गट ठेवण्यात आले होते.

प्रदर्शनाचे परीक्षण सुनील पाटील, गणेश मैंद व सुधाकर निळ यांनी यशस्वीपणे पार पाडले.या सर्व यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदीप सनंसे यांनी केले

**प्राथमिक गट :** प्रथम - आरजू रफिक खान (ए.एन.आय. स्मार्ट स्कूल, कन्नड), द्वितीय - तनिष्का विनायक राठोड (साईराज इंग्लिश स्कूल, जेऊर), तृतीय - अनुज गवळी (जि.प. प्राथमिक शाळा, विटखेडा), **माध्यमिक गट :** प्रथम - पियुष काळे (समता कन्या विद्यालय, पिशोर), द्वितीय - मेहरीन युनूस कुरेशी (संजय गांधी उर्दू हायस्कूल, कन्नड), तृतीय-जुबेरिया पठाण (सावित्रीबाई फुले कन्या विद्यालय, कन्नड)

**प्राथमिक शिक्षक गट :** प्रथम - अतुल विजय अंभोरे (जिल्हा परिषद शाळा, हतनूर), **माध्यमिक शिक्षक गट :** प्रथम (विभागून) - १) गणेश ठकसेन मैंद (विद्यानिकेतन विद्यालय, जोड बोरसर), २) स्मिता पवार (अंजनासागर विद्यालय, रामनगर, पिशोर), **प्रयोगशाळा परिचर गट :** प्रथम - संजय अण्णाराव जाधव.

# तहसील कार्यालयामध्ये राष्ट्रीय ग्राहक दिन विविध उपक्रमाने साजरा

**तभा.वृत्तसेवा**

**सिल्लोड, दि.२४ डिसेंबर :** ग्राहक हित डोळ्यासमोर ठेवून. प्रत्येक घटकांनी जागरूकपणे काम केल्यास. फसवणूक मुक्त ग्राहक हित संकल्पना खऱ्या अर्थाने राबवल्या जाईल. यासाठी सजगपणे. प्रत्येकाने आपापले काम करण्याची नितांत आवश्यकता असल्याचे मत राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने मान्यवरांनी व्यक्त केले.

दिनांक २४ बुधवारी तहसील कार्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. निवासी नायब तहसीलदार शेख हरून यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या कार्यक्रमास अखिल भारतीय ग्राहक पंचायतचे तालुकाध्यक्ष संजय कुलकर्णी. वकील संघाचे तालुकाध्यक्ष एडवोकेट अशोक तायडे एडवोकेट संतोष झाल्टे. एडवोकेट सनी हट्टी कर. यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी दीप प्रज्वलन करण्यात येऊन स्वामी विवेकानंदांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. ग्राहक दिन व त्याचे महत्त्व याचे महत्त्व अधोरेखित करीत मान्यवरांनी डोळसपणाने प्रत्येक घटकाने काम केल्यास ग्राहकांची फसवणूक होणार नाही यामुळे जागतिक पातळीवर.

देशाच्या भरभराटीला गती येईल अशी भावना व्यक्त केली ग्राहकांनी देखील जागरूक राहून आपली फसवणूक होणार नाही याची दक्षता घेण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अव्वल कारकून आशिष आवटी यांनी केले संचालन स्वस्त धान्य संघटनेचे तालुका अध्यक्ष शेरखान पठाण यांनी केले. तर नायब तहसीलदार बळीराम मुंडे यांनी आभार मानले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते अशोक सोनवणे राजू रोजेकर दुर्गाबाई पवार विनायक जोशी. गजानन मरकड मधुकर बर्डे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमास शिवसेना महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख दुर्गाबाई पवार यांनी स्वस्त धान्य दुकानांमधील सामान्य माणसाच्या धान्यातील मापातील पाप या विषयावर प्रकाश टाकत स्वस्त धान्य दुकानदाराच्या कार्यपद्धतीबाबत पुरवठा निरीक्षकाने लक्ष देण्याची गरज अधोरेखित करत ते त्याकडे दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप केला. त्यांच्या या आरोपानंतर सभागृहात हास्याचे फवारे उडाले. हे होताना बळीराम मुंडेचा चेहरा पाहण्यासारखा झाला होता.

## आर्य चाणक्य मध्ये गणित दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**पैठण दि २५ डिसेंबर :** आर्य चाणक्य प्राथमिक विद्यामंदिर, पैठण येथे थोर गणितज्ञ श्री रामानुजन यांचा जन्मदिवस गणित दिवस म्हणून साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्कर कुलकर्णी तसेच प्रमुख अतिथी श्रीमती राखी धोकटे ह्या होत्या. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले.



याप्रसंगी कु. साक्षी बडे हिने श्री रामानुजन यांच्या जीवन चरित्रावर अतिशय सुंदर अशा गोष्टी रूपाने प्रकाश टाकला तर दैनंदिन जीवनात गणिताचे महत्त्व कु. आदिश्री जैवळ हिने ओघवत्या वाणीतून विशद केल. कु. अनया शेवतेकर हीने गणितावरील स्वयंरचित कविता सादर केली. विद्यार्थ्यांनी स्वतः बनवून आणलेल्या पुष्पगुच्छानी पहिली ते सातवी पर्यंतच्या गणित शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रुतिका फटांगडे हिने केले तर आभार प्रदर्शन कु. सई कुंटे हीने केले.

## अग्रलेख...

# एकेक ‘क्रिष्णा’ही शोधून काढले पाहिजेत...

चंद्रपूर जिल्ह्यातील मथूर गावचा तरुण शेतकरी रोशन कुळेच्या किडनी विक्रीचे प्रकरण महाराष्ट्राला हादरा देणारे होते. त्यामुळे या तपासानेही वेग घेतला आणि या आंतरराष्ट्रीय जाळ्याचा पर्दाफाश होण्याच्या दिशेने पोलिसांनी महत्त्वाचा खुलासा केला. या प्रकरणाचा मुख्य आरोपी रामकृष्ण मल्लेश्याम सुंचू यास सोलापूरहून अटक करण्यात आली. त्याने कुळे यांच्यासह सोळा जणांच्या किडनी कंबोडियात विकल्याची माहिती पुढे आली. आरोपी अभियंता असला तरी त्याने या मानवी तस्करीच्या रॅकेटमध्ये स्वतःचे ‘डॉ. क्रिष्णा’ असे नामाभिधान केले होते. कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार युवक आणि आर्थिकदृष्ट्या कमकुवत अशा लोकांना तो हेरायचा आणि त्यांना किडनी विकण्याच्या मार्गावर घेऊन जायचा. रोशन कुळे हा त्यातीलच एक बळी. अशा १६ जणांना ‘डॉ. क्रिष्णा’ने किडनी विक्रीसाठी बाध्य केल्याचे आता समोर आले आहे. प्रत्येक किडनीमागे त्याला १ लाख रुपये दलाली मिळायची. विशेष म्हणजे, रामकृष्ण सुंचू यानेही यापूर्वी आपली किडनी अशीच विकली होती! व्यवसायात अपयश आल्याने २०१५ मध्ये तो स्वतः समाज माध्यमावरील ‘किडनी डोनर’च्या माध्यमातून तस्करांच्या संपर्कात आला. पुढे याच रॅकेटमध्ये तो दलाल म्हणून सामील झाला. उच्च शिक्षण असल्याने आणि इंग्रजीवर त्याचे प्रभुत्व असल्याने त्याला ते सहज जमले. पुढे ‘डॉ. क्रिष्णा’ नावाने तो या अवैध व्यवसायाचा एक भाग झाला. २०१८ ते २०२५ पर्यंत तो पाच वेळा कंबोडियात जाऊन आला आहे. त्याच्यासोबत चंदीगड आणि पश्चिम बंगालचे दोन अन्य सहकारीही असल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. कंबोडियातील नॉम पेन्ह येथील प्रेआ केट मेअलिया या रुग्णालयात या रॅकेटच्या माध्यमातून रोशन आणि अन्य सोळा जणांची किडनी काढून विकली गेली. या रुग्णालयाचा पूर्वेतिहास काही चांगला नाही. किडनी तस्करीची अनेक प्रकरणे तेथे उघडकीस आली आहेत. २०१४ मध्ये अशाच एका कांडात या रुग्णालयाचे संचालक, उपसंचालक आणि कंबोडियन डॉक्टरांना प्रशिक्षण देणाऱ्या चिनी प्राध्यापकाला अटक झाली होती. याचाच अर्थ असा की, किडनी विक्रीचे हे जाळे आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापक आणि सक्रिय आहे. मानवी अवयवांचा बाजार मांडणाऱ्या अशा कुठल्याही प्रयत्नांना आता ठेचूनच काढले पाहिजे आणि त्या दिशेने विशेष पोलिस पथकाचा तपास वेगाने मार्गस्थ होत आहे यासाठी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे.

सावकारी पाश तोडण्यासाठी रोशन कुळे या शेतकऱ्याने स्वतःच्या शरीराचा तुकडा विकण्याचा घेतलेला आत्मघातकी निर्णय खरे तर आपल्या समाजव्यवस्थेचे फार मोठे अपयश मानले पाहिजे. पण त्याहूनही भयंकर आहे ती ‘डॉ. क्रिष्णा’ नावाच्या संधिसाधूंनी चालवलेली आंतरराष्ट्रीय टोळी, जी माणसाच्या असहायतेचा फायदा घेऊन त्यांच्या अवयवांचा अक्षरशः बाजार मांडते. ही केवळ शेतकऱ्याची, गरिबांची फसवणूक नव्हे, तर अवघ्या मानवतेविरुद्ध पुकारलेला जिहाद आहे. भारतात यापूर्वीही अशा टोळ्यांनी उच्छाद मांडला होता. २००८ मधील गुडगावचे अमित कुमार रॅकेट असो, की २०२० मधील कानपूरचे अवयव तस्करीचे प्रकरण असो, की मग अलिकडच्या काळातील नेपाळ-भारत सीमा भागातील जाळे असो, या सर्वांचे काम करण्याची पद्धत सारखीच आहे. शिवाय या साऱ्या प्रकरणांत एक समान धागा असाही आहे आणि तो म्हणजे, सारेच पीडित कायम गरीब, कर्जबाजारी आणि उपेक्षित वर्गातील आहेत. आताही ‘डॉ. क्रिष्णा’ने रोशनसारखे सावकारी कर्जात पिचलेले, कर्जबाजारी सावज निवडले. समाज माध्यमांत ‘किडनी हवी आहे’ किंवा ‘गरजूंनी संपर्क साधावा’ असे निरोप प्रसारित करून अडचणीत सापडलेले लोक शोधले जातात. जेव्हा एखादा गरजू, गरीब ‘व्हॉट्स ॲप’वर ‘किडनी सेल’ शोधतो, तेव्हा हे जाळे सक्रिय होते. पुढे मानवी लचके तोडण्यासाठीची सारी प्रक्रिया अगदी सोपी होत जाते. काम झाले की तुटपुंजे पैसे हाती ठेवून पीडितांना परत पाठवले जाते. रोशनला तर परतीचाही त्रास झाला होता. त्याला तेथे कामेही करावी लागली होती म्हणे! ‘नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्युरो’च्या आकडेवारीनुसार, मानवी तस्करीच्या घटनांमध्ये वाढ होत असली, तरी अवयव तस्करीचे गुन्हे सिद्ध होण्याचे प्रमाण अत्यंत कमी होत चालले आहे. ‘ग्लोबल फायनान्शिअल इंटिग्रिटी’च्या अहवालानुसार, जगभरातील अवयव तस्करीच्या व्यापारातून दरवर्षी अंदाजे ८४० दशलक्ष ते १.७ अब्ज इतकी मोठी उलाढाल होते. एकूण प्रत्यारोपणापैकी १० टक्के अवयव हे तस्करीतून आलेले असतात. भारतात दरवर्षी हजारो लोक किडनी निकामी झाल्यामुळे मृत्यूशी झुंज देतात. पण त्यांना कायदेशीर दाता मिळणे दुरापास्त होते. मागणी आणि पुरवठ्याचे गणित जुळत नाही. त्यातून मग हा काळाबाजार फोफावतो. प्रशासन आणि आरोग्य व्यवस्था जेव्हा असे दाते मिळवून देण्याची प्रक्रिया सोपी करण्यात अपयशी ठरते, तेव्हा ‘डॉ. क्रिष्णा’सारख्या दलालांचे आणि कंबोडियातील नॉम पेन्हच्या प्रेआ केट मेअलिया अशा रुग्णालयांचे फावते.

भारतात अवयवांची खरेदी-विक्री हा अजामीनपात्र गुन्हा आहे. पण चंद्रपूरच्या प्रकरणात केवळ याच कायद्याचे उल्लंघन झाले नाही, तर भारतीय न्याय संहितेच्या कलम १४३ अंतर्गतही गंभीर गुन्हा घडला आहे. एखाद्या व्यक्तीची हतबलता ओळखून, त्याला फसवून परदेशात नेणे आणि तिथे त्याचे अवयव काढणे ही शुद्ध ‘ह्युमन ट्रॅफिकिंग’ आहे. अशा आरोपींना केवळ जन्मठेप नव्हे तर थेट मृत्युदंडाची शिक्षा व्हायला हवी. कंबोडिया, इजिप्त किंवा व्हिएतनामसारख्या देशांत जेथे कायदे थोडे शिथिल आहेत, तिथे रुग्णाला आणि दात्याला नेले जाते. हे देश एव्हाना ‘ऑर्गन टुरिझम’चे केंद्र बनले आहेत. कंबोडियातील अशा रुग्णालयाचे जाळे भारतात कुठवर पसरले आहे, याचे धागेदोरे ‘इंटरपोल’च्या मदतीने शोधण्याची गरज आहे. केवळ ‘डॉ. क्रिष्णा’सारख्या दलालास पकडून हे रॅकेट थांबणार नाही, तर त्यामागचे मुख्य सूत्रधार जे ‘व्हाईट कॉलर’ गुन्हेगार आहेत, त्यांच्या मुसक्या आवळणे आवश्यक आहे. या साऱ्यावर सातत्याने सायबर पाळत ठेवण्याचीही गरज आहे. समाज माध्यमाच्या कंपन्यांनी ‘किडनी विक्री’सारख्या ‘पोस्ट’वर तत्काळ बंदी घातली पाहिजे. चंद्रपूरच्या किडनी विक्री प्रकरणाकडे आता केवळ एका गुन्ह्याचा तपास म्हणून न पाहता ती यंत्रणेच्या शुद्धीकरणाची संधी म्हणूनही बघितली पाहिजे. कुणीही कुणाच्या अवयवाचा बाजार मांडू नये यासाठी कठोर कायद्याची अंमलबजावणी व्हायला हवी. मानवी शरीराचे भाग ही विकायची वस्तू नसून, ती निसर्गाची देणगी आहे. कंबोडियापर्यंत पसरलेले हे रॅकेट जर आजच नेस्तनाबूत झाले नाही, तर भविष्यात गरिबांचे शरीर हे श्रीमंतांच्या जगण्याचे केवळ ‘स्पेयर पार्ट’ बनून राहील. सरकारने या प्रकरणी विशेष तपास पथक नेमला आहेच, पण त्याची व्याप्ती आणखी वाढवली पाहिजे. आंतरराष्ट्रीय स्तरावर या तस्करांना ठेचले पाहिजे, हीच पीडित रोशन आणि त्याच्यासारख्या हजारो तरुणांना न्याय देणारी कृती ठरेल.

सध्या पोलिसांचा तपास योग्य दिशेने जात असून, तो कौतुकास्पद असला तरी, तपासादरम्यान समोर आलेली १६ जणांनी किडनी विकल्याची संख्या ही केवळ हिमनगाचे टोक आहे. कर्जबाजारी शेतकरी, बेरोजगार तरुण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना लक्ष्य करणे, त्यांना परदेशात नेऊन तिथे बऱ्याच वेळा बळजबरीने त्यांचे अवयव काढणे हे या टोळीचा अवैध व्यवसाय आहे. रोशनसारख्या अनेक तरुणांना फसवून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करणाऱ्या अशा व्यवसायाचे जाळे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून ते आंतरराष्ट्रीय स्तरावर पसरले आहे, हे तपासातही अधोरेखित झाले आहे. त्यामुळे ते एकदाच मुळासकट उखडून फेकले पाहिजे. सोबतच सावकारी पाश आवळणे हीसुद्धा समाजाची गरज आहे. कारण जोपर्यंत शेतीतील तोटा आणि अवैध सावकारांची दहशत संपत नाही, तोपर्यंत रोशन कुळे यांच्यासारखे तरुण अशा रॅकेटचे बळी पडतच राहतील. जसे, एकेक ‘रोशन’ शोधून काढावे लागतील. तसेच आता एकेक ‘डॉ. क्रिष्णा’ही शोधून काढले पाहिजे.

---

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# ...तर फसगत अटळ आहे

डिजिटल युगात आपले दैनंदिन जीवन मोठ्या प्रमाणात मोबाईल, संगणक आणि इंटरनेटवर अवलंबून आहे. बँकिंग व्यवहारांपासून सोशल मीडियावरील संवादापर्यंत प्रत्येक कृती आता ऑनलाईन होते. अशा वातावरणात सायबर गुन्हेगारांची संख्या झपाट्याने वाढत आहे. हे गुन्हे माहिती चोरीपासून आर्थिक फसवणूक, सोशल मीडिया अकाऊंट हॅकिंग, बनावट ओळख वापरून त्रास देणे, मालवेअर हल्ले, फिशिंग अशा अनेक स्वरूपांमध्ये घडतात. तंत्रज्ञान वापरून सायबर गुन्हेगार आर्थिक गुन्हे आणि त्यासाठीचे नवनवीन मार्ग शोधत आहेत. इंटरनेट तंत्रज्ञानाला भौगोलिक सीमा नसल्यामुळे ते उघडकीस आणणे पोलिसांसाठी अवघड ठरते. त्यामुळेच सायबर गुन्हे टाळण्याचे प्रयत्न अधिक महत्त्वाचे ठरतात. तसे म्हटले तर, मोबाईल आणि इंटरनेट ही अत्यंत प्रभावी साधने आहेत. त्यांचे छुपे सामर्थ्य ओळखून डोळसपणे उपयोग केला तर बरीच कामे सहजपणे होतात, खर्च तसेच वेळ वाचतो आणि वापरकर्त्याच्या ज्ञानातही भर पडते. या तंत्राचा वापर करून डिजिटल व्यवसाय करता येतो. पण त्यासाठी सायबर सुरक्षेचा कळीचा मुद्दा लक्षात घेणे जरुरीचे आहे. पूर्वी सुरक्षा केवळ भौतिक गोष्टींची गणली जायची. मात्र आता सायबर सुरक्षेबरोबरच सर्व संगणकीय भांडवलाची तसेच माहितीची सुरक्षादेखील अत्यावश्यक बाब झाली आहे. या चर्चेच्या पृष्ठभूमीवर सर्वप्रथम सायबर गुन्ह्यांची वैशिष्ट्ये समजून घेऊ या. जसे की, यात सहभागी असणारा गुन्हेगार कुठूनही कारवाई करू शकतो. पुरावे डिजिटल असल्याने लपवता येतात. अनेकदा पीडित व्यक्तीला गुन्हा घडल्याचे उशिरा कळते आणि मुख्य म्हणजे हे गुन्हेगार आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असतात. आपण पाहतो की, नववर्षाच्या काळात लोक मोठ्या प्रमाणात व्हॉट्स ॲप, फेसबुक, इन्स्टाग्रामवर शुभेच्छा संदेश तसेच ग्रीटिंग कार्ड, व्हिडीओ, लिंक शेअर करतात. अशा भावनिक वातावरणाचा फायदा घेणे हे अनेक सायबर गुन्हेगारांचे प्रमुख धोरण असते. विशेषतः फिशिंग लिंक असणारे संदेश अत्यंत धोकादायक ठरतात. अशा संदेशांमध्ये लिंक असते. त्यावर क्लिक करणाऱ्याचा डेटा, ओटीपी (वनटाईम पासवर्ड), बँक तपशील आदी लगेचच चोरी होतो.

बनावट शुभेच्छा वेब पेज, ई-मेल किंवा व्हॉट्स ॲपवर एक अशी लिंक मिळते; त्यावर क्लिक करताच मोबाईलमध्ये मालवेअर इन्स्टॉल होते. सोशल मीडिया अकाऊंट हॅकिंग प्रकारात शुभेच्छा देण्याच्या नावाखाली काही ॲप डाऊनलोड करण्याची विनंती केली जाते. ते ॲप परवानगी मागून फोनमधील प्रणालीत प्रवेश मिळवतात. क्यूआर कोड स्कॅममध्ये क्यूआर



कोडद्वारे बँक खात्यातून पैसे वळते करून घेतले जातात. असे गुन्हेगार डिजिटल प्रतिष्ठा वाढविण्याचे नवे तंत्र शोधत म्हणतात की, ‘हा मेसेज ५० लोकांना पाठवा, तुमचे भाग्य फुलेल’ अशा चेनमधून तुमचा डेटा ट्रॅक होऊन पुढील फसवणुकीसाठी वापरला जातो. या आणि अशा प्रकारच्या गुन्ह्यांचे परिणाम केवळ आर्थिक नसतात तर मानसिक, सामाजिक आणि कायदेशीर तसेच अत्यंत गंभीर असू शकतात. जसे की, फिशिंग लिंक किंवा क्यूआर कोडवर क्लिक केल्यास खात्यातून पैसे त्वरित दुसऱ्या खात्यात वळते होतात. अनेकदा पीडिताला कळण्यापूर्वीच खाते रिकामे झालेले असते. फोनमधील फोटो, संपर्क क्रमांक, ई-मेल, डॉक्युमेंट्स यांची चोरी झाल्यानंतर हा डेटा ब्लॅकमेलिंग किंवा ओळख चोरीसाठी वापरतात. अकाऊंट हॅक झाल्यास गुन्हेगार त्यातून खोटे संदेश पाठवून फसवणूक करतात. त्यावरून अश्लील छायाचित्र, व्हिडीओ टाकले गेल्यास व्यक्तीची प्रतिमा खराब होते. फसवणूक झाल्यानंतर भीती, अपराधीपणा, मानसिक दबाव तसेच कुटुंबातील तणाव वाढतो. अशा घातपातामुळे संस्थात्मक सुरक्षा भंगाचा मोठा धोकाही लक्षात घ्यायला हवा. जसे की, एखाद्या कर्मचाऱ्याने अशा संदेशांवर क्लिक केल्यास ऑफिस नेटवर्कमध्ये मालवेअर प्रवेश करू शकतो. तसे झाल्यास कंपनीवर रॅन्समवेअरचा हल्ला होऊ शकतो.

दरवर्षी सायबर गुन्ह्यांची पद्धत बदलत असते. नवे वर्ष जवळ आल्यावर त्यांच्या तंत्रात काही नव्या गोष्टी दिसतात. उदाहरणार्थ, एआयच्या मदतीने अगदी नैसर्गिक दिसणारे शुभेच्छा संदेश, आवाज, व्हिडीओ तयार केले जातात आणि एखाद्याला ते खरे वाटतात. नववर्षाच्या शुभेच्छा म्हणून ओळखीच्या व्यक्तीचा आवाज किंवा चेहरा वापरून बनावट व्हिडीओ पाठविला जातो आणि दिलेल्या लिंकवर क्लिक करण्यास सांगितले जाते. नंतर फसवणूक करणारे बॉट वापरून त्वरित उत्तर देतात आणि विश्वास निर्माण करून संवेदनशील माहिती मागतात. सोशल इंजिनीअरिंग तंत्र वापरून मानसशास्त्रीय पद्धतीने व्यक्तीला आकर्षित करण्याच्या उद्देशानेही भावनिक संदेश पाठविले जात आहेत. तेव्हा फसवणुकीपासून दूर राहण्यासाठी नागरिकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. त्यासाठी काही सोप्या, पण अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची दखल घ्यावी.

कोणत्याही शुभेच्छा संदेशातील लिंकवर क्लिक करण्यापूर्वी तीन सेकंद थांबा आणि हा संदेश कोणाकडून आला आहे, हा प्रश्न स्वत:लाच विचारा. त्यामध्ये अपेक्षित नसणारी लिंक नसल्याची खात्री करा. संदेशातील भाषा किंवा ऑफर संशयास्पद दिसत असेल तर सावध व्हा. अनोळखी क्रमांक किंवा अचानक संपर्क साधणाऱ्या व्यक्तीकडून आलेल्या शुभेच्छा संदेशांवर विश्वास ठेऊ नका. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे आपल्या बँक खात्याचा तपशील कधीही शेअर करू नका. कुठल्याही शुभेच्छा संदेशासाठी बँक तपशील विचारला तर ती १०० टक्के फसवणूकच असते. त्याचप्रमाणे क्यूआर कोड स्कॅन करतानाही कायम सावध राहा. फक्त विश्वसनीय स्रोतांमधील क्यूआर कोड स्कॅन करा. कधीही गिफ्ट किंवा लकी ड्रॉसाठी क्यूआर स्कॅन करू नका. मोबाईलमध्ये अँटीव्हायरस आणि सिक्युरिटी कायम अपडेट ठेवा. सिस्टिम अपडेट, अँटीव्हायरस तसेच सुरक्षित ब्राऊझर वापरा. नेहमी द्विस्तरीय प्रमाणीकरण वापरा. सोशल मीडिया, ई-मेल, बँकिंगमध्ये ही दक्षता पाळायलाच हवी. यात ओटीपीशिवाय लॉगिन होऊच नये, अशी व्यवस्था असते. खेरीज सार्वजनिक वायफाय वापरतानाही सतर्क राहावे. पब्लिक वायफायवर कधीही महत्त्वाची बँकिंग ॲक्टिव्हिटी करू नका. अगदी आदिमकाळापासून पाहिले तरी दिसते की, कोणताही समाज किंवा संस्कृती गुन्हेगारीपासून कधीच पूर्णतः मुक्त नव्हती आणि यापुढेही नसेल. त्यामुळे (कोणत्याही प्रकारच्या) गुन्ह्यांचे स्वरूप आणि मुळात ते का केले जातात, याचा विचार (प्रतिबंधक उपायांबरोबर) करावाच लागेल. कुठल्याही घटनेला दोन बाजू असतात. साधे सुरीचे उदाहरण घेतले तरी फळ कापण्यासाठी किंवा एखाद्याला इजा करण्यासाठी वापर होऊ शकतो. संगणक, मोबाईल आणि इतर आधुनिक उपकरणांचेही तसेच आहे. जगणे, व्यवहार, उद्योग, व्यापार वेगवान आणि सुलभ करण्यासाठी हे तंत्रज्ञान विकसित तसेच लोकप्रिय झाले. पण यामुळे निर्माण होणारा ई-कचरा, सायबर गुन्हे, डिजिटल व्यसनाधीनता यासंबंधीच्या जाणिवा प्रगल्भ व्हायला हव्यात. तरच आपण त्याच्याशी संबंधित धोक्यांपासून दूर राहू शकू.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

**नीलेश जोशी**

# कायदा हा अंतिम उपाय नव्हे

भौतिक प्रगतीची गती हे या शतकाचे वैशिष्ट्यच. या प्रगतीमुळे अनेक बाबी सोईच्या, सहज आणि सुखकर झाल्याचे दिसून येते. आता तर या बाबींची सर्वांनाच इतकी सवय झाली आहे की जणू या वस्तू जीवनावश्यकच आहेत. पण सहज, सोईच्या असलेल्या अनेक उपकरणांचे दुष्परिणाम आता दिसायला लागले आहेत. स्वाभाविकच या दुष्परिणामांना रोखावे कसे, असा प्रश्न देखील समाजहिताची चिंता करणाऱ्यांसमोर उभा ठाकला आहे. मग याचे चिंतन करून समस्येवर मात करण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जातात. मोबाईल आणि त्याचा वापर ही एक अशीच समस्या आहे. त्यातही स्मार्ट फोन आल्यापासून वेगवेगळ्या ॲप्सच्या माध्यमातून समाज माध्यमावरील नव्या पिढीचा वावर चिंताजनक आहे. पण या पिढीचा जन्मच डिजिटल युगात झाला. त्यामुळे नकळत्या वयापासून मोबाईल, इंटरनेट वापराची सवय त्यांना लागली. आता ही सवयच समस्या म्हणून जगाला चिंतेत टाकणारी आहे आणि म्हणूनच ऑस्ट्रेलिया येथे १६ वर्षांखालील मुलांसाठी समाज माध्यमावर खाते उघडण्यास बंदी करण्यात आली. अशा प्रकारची बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया हा जगातील पहिला देश आहे. ऑस्ट्रेलियाने गतवर्षी नोव्हेंबर महिन्यात ‘ऑनलाईन सेफ्टी अमेंडमेंट बिल’ पारित केले. तर १० डिसेंबरपासून या संदर्भातील कायदा लागू केला. आता ऑस्ट्रेलियात १६ वर्षांखालील मुलांना समाज माध्यमावर फेसबुक, इन्स्ट्राग्राम, स्नॅपचॅट, टिकटॉक, युट्युब, थ्रेड, रेडईट आणि कीक आदी ठिकाणी खाते उघडता येणार नाहीत. विशेष म्हणजे या कायद्याचे पालन न झाल्यास दोषी कंपनीला सुमारे ४०० कोटींचा दंड होऊ शकतो अशी तरतूद आहे. हा कायदा मुलांना ऑनलाईन हानिकारक कंटेंटपासून वाचविण्यासाठी उचललेले एक पाऊल असल्याचे ऑस्ट्रेलिया शासनाचे म्हणणे आहे.

सर्व दूर अल्पवयीन मुलांचा समाज माध्यमांवर वाढता वावर, समाज माध्यमांवर असलेला हानिकारक मजकूर आणि त्यामुळे नकळत्या वयातील मुलांमध्ये निर्माण होत असलेल्या समस्या यावर उपाययोजना म्हणून केलेला हा प्रयत्न निश्चितच चांगला म्हटला पाहिजे. पण केवळ बंदी घालून, कायदा करून या समस्येचे निराकरण होईल का याचा देखील विचार व्हावा. अल्पवयीन मुलांना समाज माध्यमांवर खाते उघडण्यास बंदी घालणारा ऑस्ट्रेलिया जगातील पहिला देश ठरला असला तरी ही समस्या जगातील सर्वच देशांना भेडसावत आहे. भारतातही या समस्येचा परिणाम पाहावयास मिळतो. अनेकदा त्यावर विविधांगी चर्चा देखील होते. खरं म्हणजे आपल्या येथे लहान मुलांपासून काहीसा दूर असणारा मोबाईल कोविड काळात नाईलाज म्हणून का होईना पालकांना मुलांकडे सोपवावा लागला. त्या काळातील ती गरजच होती. पण आता तेव्हा हातात दिलेला मोबाईल सोडविताना पालकांची कसरत होत आहे. मोबाईलमध्ये दिसणारे समाज माध्यमांवरील कंटेंट ही पालकांसमोर सर्वांत मोठी समस्या आहे. वास्तविक आपल्या येथील व्यवस्थेत कुटुंब व्यवस्था हे आपले मोठे बलस्थान. कुटुंबातून मूल्य शिक्षणासह संस्काराची सहज रुजवण हे तर वैशिष्ट्यच. कुटुंबातील सहज सोप्या संवादातून अनेक अडचणींवर मात करण्याची आपली परंपरा आहे.

पण दुर्दैवाने कुटुंबातील संवाद बऱ्याच प्रमाणात हरवत असल्याचे वास्तव सर्वांनाच मान्य करावे लागेल. एकीकडे अल्पवयीन मुलांमधील मोबाईलचे व्यसन दूर व्हावे अशी अपेक्षा असताना दुसरीकडे त्याच मोबाईलमध्ये डोके खुपसून बसणारे पालक जर असतील तर अल्पवयीन असणाऱ्या मुलांची चूक म्हणावी का? या संदर्भात ऑस्ट्रेलियाने कायदा करून बंदी घातल्याच्या वृत्ताचे सर्वदूर कौतुक होत असले तरी अशा प्रकारची बंदी हा अंतिम उपाय नक्कीच नाही. ऑस्ट्रेलियात किंवा भारतातही असा कायदा केला तरी हे सरावलेले घटक चोरून ते पाहणारच नाही असे खात्रीने सांगता येत नाही. त्यासाठी कुटुंबा-कुटुंबात व्यापक संवाद, कुठल्या तरी चांगल्या निमित्ताने सर्वांनी एका ठिकाणी येऊन आनंद साजरा करणे, मुलांना पुस्तक वाचन, संतांचे चरित्र सांगणे आदी अनेक उपाय करावे लागतील अर्थातच काही दशकांपूर्वी सहज होणाऱ्या बाबींचे अनुकरण पुन्हा प्रयत्नपूर्वक करावे लागेल. तरच ‘मोबाईल वेडा’च्या समस्येवर मात करता येईल.

९४२२८६२४८४

---


## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# राहुल गांधींचे वादग्रस्त परदेश दौरे

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचा प्रत्येक परदेश दौरा वादग्रस्त ठरत असतो. विशेष म्हणजे प्रत्येक परदेश दौरा वादग्रस्त ठरवण्यात अन्य कोणाचे नाही तर त्यांचेच योगदान असते. त्यानुसार त्यांचा यावेळचा जर्मनीचा दौराही असाच वादग्रस्त ठरला. यावेळी संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरू असताना राहुल गांधी जर्मनीच्या दौऱ्यावर गेले. खरं म्हणजे संसदेचे हिवाळी अधिवेशन संपल्यानंतरही ते जर्मनीच्या दौऱ्यावर गेले असते तर आकाश कोसळले नसते. संसदेचे अधिवेशन सुरू असताना विरोधी पक्षनेत्याने परदेश दौऱ्यावर जाऊ नये, असा काही नियम नाही, पण संकेत मात्र निश्चित आहे. संसद अधिवेशन काळातील राहुल गांधी यांच्या परदेश दौऱ्याचे समर्थन करताना काँग्रेस पक्षाने संसदेचे अधिवेशन सुरू असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या परदेश दौऱ्याचाच दाखला दिला. पण मोदी यांचा परदेश दौरा व्यापक देशहितासाठी असतो, तर राहुल गांधी यांचा परदेश दौरा देशाला अडचणीत आणण्यासाठी, देशाची बदनामी करण्यासाठी असतो, याचे काँग्रेस पक्षाला सोयीस्कर विस्मरण झाले.

बरं जर्मनीत जाऊन राहुल गांधी यांनी दिवे तरी काय लावले, तर आपल्याच देशावर टीका केली, देशाची बदनामी करण्याचा प्रयत्न केला. बर्लिन येथे हर्टी स्कूलमध्ये राजकारण एक ऐकण्याची कला, या विषयावर ‘डर्टी’ भाषण करताना राहुल गांधी यांनी मतचोरीचा मुद्दा मांडला आणि हरयाणा, महाराष्ट्रातील निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप केला. भारतातील संवैधानिक संस्थांवरही त्यांनी नेहमीसारखे आरोप केले. असे आरोप राहुल गांधी यांनी आतापर्यंत किमान शंभरवेळा तरी केले असावे. विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांनी संसदेत असे आरोप करायला हरकत नाही, तो त्यांचा अधिकार आहे. पण परदेशात जाऊन आपल्या देशावर आरोप करत राहुल गांधी यांनी एकप्रकारे संकेतभंग आणि औचित्यभंग केला आहे. देशात असताना शंभर आणि पाच असे वेगवेगळे असले तरी हरकत नसते, मात्र परदेशात गेल्यावर शंभर आणि पाच यांनी एकशेपाच मिळून वागायचे असते, किमान तसे दर्शवायचे तरी असते. पण राहुल गांधी यांना असे औचित्य आणि संकेतांचे भान कधी राहात नाही. विरोधी पक्षनेता म्हणून राहुल गांधी यांना मायदेशात पंतप्रधान तसेच सरकारवर टीका करण्याचा पूर्ण अधिकार आहे. तो त्यांचा अधिकार कोणी नाकारत नाही. मात्र परदेशातच्या भूमीवरून देशाच्या पंतप्रधानांवर टीका करण्याचा तसेच देशाची बदनामी करण्याचा त्यांना कोणताच अधिकार नाही. मुळात मतचोरीबाबत राहुल गांधी यांनी जे आरोप केले, ते देशातील जनतेने पूर्णपणे



नाकारले आहे. त्यामुळे आपल्या जुन्या आरोपांची पुनरावृत्ती करण्याचे त्यांना कारण नाही. असे करत राहुल गांधी स्वत:ची तसेच विरोधी पक्षनेतेपदाची विश्वसनीयता कमी करत आहे. मुळात आपण काय बोलतो, त्याचा परिणाम काय होतो, याचे भान त्यांना राहात नाही, असे म्हणावेसे वाटते. मागील वर्षी राहुल गांधी यांच्या अमेरिका दौऱ्यातही त्यांच्या विधानावरून वादळ उठले होते. भारतात अल्पसंख्यकांना असलेल्या धार्मिक अधिकारबाबत बोलताना राहुल गांधी यांनी चुकीचा संदर्भ दिला होता. शिखांना पगडी घालण्याची परवानगी आहे का, गुरुद्वारात कडा घालून जाण्याची परवानगी आहे का, हा वाद फक्त शिखांशी संबंधित नाही तर भारतातील सर्व अल्पसंख्यकांशी संबंधित आहे, असे तारे राहुल गांधी यांनी तोडले होते. एकप्रकारे राहुल गांधी यांनी भारतात अल्पसंख्यकांवर धार्मिक आधारावर अन्याय होत असल्याचा आरोप केला होता.

भारतात शीख नागरिकांना पगडी आणि कडा घालण्याची पूर्वापार परवानगी आहे, अगदी विमानप्रवासातही ते आपल्या जवळ कृपाण बाळगू शकतात. त्यामुळे भाजपानेच नाही तर शीख नागरिक तसेच त्यांच्या सर्व संघटनांनीही राहुल गांधी यांचे सर्व आरोप फेटाळून लावले होते. राहुल गांधी यांच्या या बिनडोक आरोपाचा फायदा घेत खलिस्तानवादी अतिरेकी गुरपतवंतसिंग पन्नू याने, म्हणूनच आमची खलिस्तानची मागणी न्याय्य असल्याचा दावा केला होता. अमेरिका दौऱ्यात राहुल गांधी यांनी भारतविरोधी भूमिकेसाठी ओळखले जाणारे खासदार इल्हान उमर यांची भेट घेतली होती. इल्हान उमर यांनी अमेरिकी काँग्रेसमध्ये भारतविरोधी प्रस्ताव मांडला होता, तसेच ३७० कलम रद्द करण्याच्या मोदी सरकारच्या निर्णयाला विरोध केला होता. परदेशात जाऊन देशावर टीका करू नये, असा कायदा नसला तरी तो संकेत आहे.

असा प्रकार एखादवेळी झाला तर समजण्यासारखे आहे, पण राहुल गांधी वारंवार त्यांची पुनरावृत्ती करतात. असे करत ते काँग्रेस पक्षाचे नुकसान करतात. त्यांच्या देशविरोधी कृत्यांमुळे इंडिया आघाडीतील मित्रपक्षांच्या नेत्यांचीच नाही तर काँग्रेस पक्षातील नेत्यांचीही अडचण होत आहे. त्यामुळे त्यांच्या अशा बेजबाबदार विधानांपासून इंडिया आघाडीतील मित्रपक्षांचे नेते आणि काँग्रेस पक्षातील नेतेही स्वत:ला दूर ठेवत आहे. विरोधी पक्षनेता हे संवैधानिक पद आहे. त्यामुळे या पदावर विराजमान होणाऱ्या व्यक्तीकडून देशातील नागरिकांच्या खूप अपेक्षा असतात. पण त्या अपेक्षांची पूर्तता करण्यात राहुल गांधी कमी पडत आहे. मुळात विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारी स्वीकारताना राहुल गांधी यांनी विरोधी पक्षनेत्याचे कर्तव्य, अधिकार आणि जबाबदारी यांचा अभ्यास करायला पाहिजे होता. यासोबत देशात आतापर्यंत कोण कोण विरोधी पक्षनेते झाले, त्यांची सभागृहातील तसेच सभागृहाबाहेरील वागणूक कशी होती, याचा अभ्यासही करायला पाहिजे होता. काँग्रेस सांसदीय पक्षाच्या नेत्या सोनिया गांधी पुत्रप्रेमामुळे आंधळ्या झाल्या आहेत. त्यामुळे त्यांना राहुल गांधी कधीच चुकत नाही, असे वाटणे स्वाभाविक आहे. पण काँग्रेस पक्षात राहुल गांधींपेक्षा अनुभवी, विद्वान असे अनेक नेते आहेत. त्यांनी राहुल गांधींना समजवून सांगण्याची गरज आहे. कोणताही लहान मुलगा बोलायला लागतो, तेव्हा तो तोतडा बोलत असतो, चालताना अडखळत असतो. सुरुवातीला याचे सर्वांना कौतुक वाटते. पण लहान मुलगा थोडा मोठा झाल्यावरही तोतडा बोलत असेल आणि अडखळत चालत असेल तर त्याला डॉक्टरकडे नेण्याची गरज असते. राहुल गांधी यांची स्थिती मोठा झाल्यावरही तोतडे बोलणाऱ्या लहान मुलासारखी झाली आहे. त्यामुळेच ते हास्यास्पद ठरत आहे. राहुल गांधी यांना विरोधी पक्षनेते म्हणून जे आरोप करायचे ते त्यांनी देशात केले पाहिजेत. महत्त्वाचे म्हणजे जे आरोप करायचे ते पुराव्यानिशी केले पाहिजेत. उचलली जीभ लावली टाळूला अशा प्रकारचे आरोप करू नये. हरयाणा आणि महाराष्ट्राच्या निवडणुकीत मतचोरी झाली, काही गैरप्रकार झाले, असे त्यांना वाटत असेल तर त्यांनी खुशाल न्यायालयात जावे, पण निराधार आणि खोडसाळ आरोप करत देशाची तसेच देशातील संवैधानिक संस्थाची बदनामी करू नये. जनतेच्या सहनशक्तीची आणि संयमाची परीक्षा पाहू नये, असे सांगावेसे वाटते.

९८८१७१७८१७

---

## वाचक पत्रे

### नायलॉन मांजाची तस्करी आणि विक्री जोमात

डिसेंबरची बोचरी थंडी हळूहळू ओसरायला लागली की सर्वांना मकर संक्रांतीचे वेध लागतात. आधी स्त्रियांचा सण म्हणून ओळखला जाणारा हा सण हल्ली सर्वांसाठी पतंगाचा उत्सव म्हणून ठरलेला आहे. अगदी नोव्हेंबरपासून सुरू झालेली पतंगबाजी या काळात मोठ्या प्रमाणात वाढलेली असते. गुजरातसारख्या राज्यात तर विशेष करून पतंग फेस्टिव्हल आयोजित करून याचा आनंद लुटला जातो. आपल्याकडे मात्र या उत्सवाला गालबोट लागते की काय, अशी परिस्थिती गेल्या काही काळापासून निर्माण व्हायला लागली आहे. पूर्वी पतंगासाठी वापरण्यात येणारा मांजा हा साध्या सुताचा असायचा. त्याचाच मांजा घोटून पतंग उडवण्यासाठी किंवा शर्यतीसाठी वापरला जायचा. तसा मांजा वापरणे सोडून आता जिथे तिथे सर्रास प्रतिबंधित नायलॉन मांजा वापरून पतंग उडवायला लागले आहेत. साधा मांजा पर्यावरणीय दृष्टीने घातक नव्हताच. कुठे झाडावर अडकला तरी सडून जायचा. कुणी पकडला तरी इजा होण्याचे प्रमाण अत्यल्प असायचे. मात्र, गेल्या काही काळापासून देशात नायलॉन मांजाचा अतिरेक वाढला तशा दुर्घटना होण्याचे प्रमाण सुद्धा वाढीस लागले आहे. अजून जानेवारी महिना यायचाच आहे. तरी रोज कुठे ना कुठे नायलॉन मांजा पकडल्याच्या बातम्या येताहेत. नायलॉन मांजाची तस्करी इतकी वाढली आहे की त्यामुळे यंत्रणा सुद्धा त्रस्त झाली आहे. याच मांजामुळे उद्या कुणाचा गळा कापला जाईल. कुणाचे बोट अन् कुणाचा हात कापला जाईल. याचं सोयरसुतक मात्र त्यांना नाही.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### युती मुंबई वाचविण्यासाठी की स्वअस्तित्वासाठी?

महानगर पालिकचे बिगुल वाजले. त्याआधी नगरपंचायत, नगरपरिषदांच्या निवडणुका आटोपल्या. भाजप व मित्र पक्षाला घवघवीत यश मिळालं. उबाठा जिथे होता तेथून त्याचा उबाठाच झाला. बोलण्यातला राज माणूस प्रत्यक्ष जमिनीवर मात्र शून्यच राहिला. अवघी लोकसभा, विधानसभा काँग्रेसचे तुणतुणे वाजवत उद्धव फिरले पण मुंबईत मात्र संगीत बिघडले. आता राज निवडावा की काँग्रेस निवडावा यात उद्धव यांनी राज यांना निवडले. आता शून्यातल्या या राजला दोन-चार आकड्यात तरी आणण्याची जबाबदारी या मोठ्या भावावर आली. वर बाळासाहेबांना आनंद झाला असेल पण इंडिया आघाडीत आपला बाळ गेला याचे दुःखही झाले असेल. मुंबई मराठी माणसाची म्हणता म्हणता परप्रांतीयांची झाली असे उबाठा म्हणत आहे. व्यवसाय करायला मराठी माणसाला शिकवले नाही न आपण. तिकडे मनसे यांनी मराठी बोलता येत नाही म्हणून मराठीच मुलाला लोकलमध्ये जबर मारले होते, त्याला आपला जीव गमवावा लागला. यांच्या या वागणुकीने देशभरात जे मराठी बांधव आहेत त्यांना असेच उत्तर मिळाले तर याला जबाबदार कोण राहील. मनसे नेते बोलून मोकळे होतात पण त्याचा परीणाम काय होणार याचा विचार करत नाही. तिकडे काकांसोबत गेल्याने, सोनिया मावशीकडे गेल्याने मुंबईकर मराठी थोडीच खुश आहेत. मूठभर फुगडी गँग दिसली की भरघोस पाठिंबा आहे असे या नेत्यांनी समजू नये. पत्रकार परिषद झाल्यावर तर कौटुंबिक फोटोसेशन झाले. पुन्हा तेच कुटुंब. नाही म्हणायला संजय राऊत होतेच बाजू सांभाळायला. पण या बुवांमुळे ज्या चुकीच्या गोष्टी घडून गेल्या त्याला मुंबईकर कसा माफ करेल? त्यामुळे कितीही युती होवो, ठाकरी भाषा बरगळवो पण उबाठा-मनसेला महानगर पालिका घेणे जमणार नाही असे दिसते. ही युती मुंबई वाचविण्यासाठी आहे की आपले संपलेले अस्तित्व वाचविण्यासाठी ही पण शंका येऊ शकते.

**मनोज वैद्य**/९८२२९४९२६०

---

## आजचे संघगीत-८३

गुरुवार, २५ डिसेंबर २०२५

### जय जय भारत हाच असू दे मंत्र मुखी दिनरात

‘जय जय भारत’ हाच असू दे मंत्र मुखी दिनरात ॥धृ॥

प्रभात-काळी, रोज सकाळी
भारतभूची गा भूपाळी
भारतभूचे स्तोत्र घुमू दे रोज तुझ्या सदनात ॥१॥

हा रघुनंदन राम तुझा रे
हाच मुरारी श्याम तुझा रे
विटेवरचा हाच विठोबा, प्राण हाच हृदयात ॥२॥

इतिहासाचे कर पारायण
जाण तुझे तू ते रामायण
‘कर्तव्याची जाणिव’ गीता हीच असो स्मरणात ॥३॥

निजरक्ताचे लावुन कुंकुम
वाहुन चरणी देहाचे सुम
प्राणांचीही उजळ प्रसंगी आरतीस फुलवात ॥४॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### श्री शिवाजी महाविद्यालयाची साक्षी चव्हाण महाराष्ट्र नेटबॉल संघाच्या कर्णधारपदी

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील श्री शिवाजी महाविद्यालयातील बारावीत शिकणारी साक्षी चव्हाण हिची मंगलोर येथे होणाऱ्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र राज्याच्या १९ वर्ष वयोगटातील नेटबॉल संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे.

२५ ते २९ डिसेंबर दरम्यान मंगलोर येथे होणाऱ्या ६९ व्या राष्ट्रीय शालेय नेटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघाची निवड नुकतीच झाली. ही निवड कोल्हापूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच आदर्श विद्यानिकेतनच्या संयुक्त विद्यमानाने झालेल्या राष्ट्रीय स्पर्धा पूर्व प्रशिक्षण शिबिरातून करण्यात आली. या शिबिरातून साक्षीला महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळाली. तिला क्रीडा संचालक डॉ.संतोष कोकीळ, कनिष्ठ क्रीडा विभागाचे प्रमुख प्रा. राजेसाहेब रेंगे यांचे मार्गदर्शन लाभले. तिच्या या देदीप्यमान यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ.प्रकाशराव सोळंके, सरचिटणीस आ. सतीशराव चव्हाण, महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख हेमंतराव जामकर, प्राचार्य डॉ. बाळासाहेब जाधव, उपप्राचार्य, डॉ. श्रीनिवास केशट्टी, उपप्राचार्य डॉ.रोहिदास नितोंडे,उपप्राचार्य प्रा. नारायण राऊत, पर्यवेक्षक प्रा. संजय ढवळे,नेटबॉल असोसिएशनचे सचिव कैलास माने, महेश काळदाते, विश्वास पाटील, गणेश गरड यांनी अभिनंदन केले.

### महापालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक विभागाची आढावा बैठक

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ च्या अनुषंगाने आज बुधवार २४ डिसेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता निवडणूक अधिकारी तथा आयुक्त नितीन नार्वेकर यांच्या दालनात सर्व निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक विभागाची आढावा बैठक पार पडली.

या बैठकीत झोनल आदेश पारित करणे, पोस्टल मतदानाच्या अनुषंगाने आवश्यक व्यवस्था करणे, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अंतर्गत पथकांच्या वेळोवेळी बैठका घेणे, निवडणूक कार्यक्रमात नियुक्त अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या पोस्टल मतदानाची व्यवस्था करणे, रूट गाईड नियुक्ती तसेच ईव्हीएम मशिन सिलींगबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

तसेच उमेदवारांच्या दैनंदिन निवडणूक खर्चाची माहिती संकलित करण्यासाठी कर्मचारी नियुक्ती, आचारसंहिता कालावधीत सभा आयोजनासाठी परवानगी, वाहन परवानगी आदी विषयांवरही चर्चा करून आवश्यक कार्यवाही करण्याबाबत निवडणूक अधिकाऱ्यांनी सूचना दिल्या. या बैठकीस निवडणूक निर्णय अधिकारी शोभादेवी जाधव, जिवराज डापकर, उदयसिंह भोसले, रतनसिंह साळोक व विद्या मुंडे, निवडणूक विभाग प्रमुख विकास रत्नपारखे तसेच पवन देशमुख उपस्थित होते.

### श्रीमती प्रमिलाबाई जनार्धनराव देशमुख यांचे वृध्दापकाळामुळे निधन

**परभणी,/प्रतिनिधी :** येथील देशमुख गल्लीतील ज्येष्ठ नागरीक श्रीमती प्रमिलाबाई जनार्धनराव देशमुख यांचे गुरुवार २५ डिसेंबर रोजी पहाटे १.३१ वाजता वृध्दापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८४ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, जावई, सूना, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

माजी खासदार स्व. शेषेराव देशमुख यांचे ज्येष्ठ बंधू स्व. जनार्धनराव देशमुख यांच्या त्या धर्मपत्नी होत. माजी नगरसेवक राजाभाऊ उर्फ श्रीमंत जनार्धनराव देशमुख, प्रकाश देशमुख व महानगरपालिकेचे स्थायी समितीचे माजी सभापती सुनील उर्फ बाबा जनार्धनराव देशमुख यांच्या त्या मातोश्री होत. दरम्यान, श्रीमती देशमुख यांच्या पार्थीवावर बेलेश्वर मंदिराजवळील मळ्यात अंत्यविधी करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्रीय सेवा योजनेमधून समृद्ध देशासाठी सक्षम नेतृत्व घडते : प्राचार्य डॉ. पवार

शारदा महाविद्यालयाद्वारे मांडवा येथे शिबिराचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** राष्ट्रीय सेवा योजनेमधून सेवाभाव रुजतो तसेच समृद्ध देशासाठी सक्षम नेतृत्व घडते. अशा शिबिरातून विद्यार्थ्यांवर श्रम संस्कारासोबतच ग्रामीण प्रश्नांची ओळख होते व भावी काळात विविध क्षेत्रात नेतृत्व क्षमता वाढते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. बबन पवार यांनी केले.

येथील शारदा महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकासावर भर' या विषयावर विशेष शिबिराचे आयोजन मौजे मांडवा येथे करण्यात आले. यावेळी उद्घाटनाच्या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. बबन पवार उपस्थित होते तर उद्घाटक म्हणून मा. चेअरमन अशोक घुले तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. नितीन बावळे, विष्णुपंत पारधे, ज्ञानेश्वरमाऊली चव्हाण उपस्थित होते.

यावेळी प्रमुख अतिथी प्रा. डॉ. बावळे यांनी 'छत्रपती शिवरायांचा शेतीविषयक दृष्टिकोन' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करत तरुणांनी शिवरायांचा आदर्श घेऊन वाटचाल करावी, असे मत व्यक्त केले. तर उद्घाटक घुले म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजना व्यक्तिमत्व विकासाला चालना देते व देशाचा सक्षम युवक घडवते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये सक्रिय सहभागी झाले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाट्याने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.
**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,
**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# गंगाखेडला कॅफे हाऊसच्या नावाखाली गैरप्रकार बंदोबस्त करण्याची काँग्रेसची मागणी

**विशेष प्रतिनिधी**
**गंगाखेड,/प्रतिनिधी-** शहराच्या मुख्य रस्त्यासह विविध भागांमध्ये कॅफे हाऊस, चायनीज हॉटेल सुरू झाले आहेत. या ठिकाणी येणारांना प्रायव्हसी उपलब्ध करून दिली जात असल्याने मोठ्या प्रमाणात गैरप्रकार होवू लागले आहेत. कॅफे हाऊस मधील हे प्रायव्हसी अड्डे बंद करून शहरातील रोमीओंचा बंदोबस्त करावा, अशी मागणी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष गोविंद यादव यांनी पोलीस निरीक्षकांकडे केली आहे.

यासंदर्भाने गोविंद यादव यांनी आज पोलीस निरीक्षक श्रीकांत डोंगरे यांची भेट घेवून निवेदन सादर केले. शहरातील अनेक कॅफ हाऊस मध्ये आवश्यकता नसताना छोट्या केबीन करून त्यांना पडदे लावण्यात आलेले आहेत. या छोट्या केबीनमध्ये अश्लील चाळे करण्याबरोबरच अवैध नशापाण केल्याचे प्रकार घडत आहेत. अशा खास जागा



उपलब्ध करून देण्यासाठी हॉटेल चालक जादा रकमांची वसुली करत असल्याची बाब यावेळी गोविंद यादव यांनी पोलीस निरीक्षक डोंगरे यांच्या निदर्शनास आणून दिली. शहरातील विविध शाळा, महाविद्यालये, शिकवणी वर्गाचे ठिकाणी रोडरोमीओंचा वावर वाढलेला आहे.

अल्पवयीन मुलींचा पाठलाग करणे, त्यांना धमकावणे, वेगवेगळ्या कारणांनी त्यांना ब्लॅकमेल करणे असे प्रकार वारंवार घडत आहेत. हे प्रकार थांबवण्यासाठी चिडीमार पथक, दामिनी पथक सक्रिय करावे. सर्व ठिकाणी सीसी टिव्ही कॅमेरे बसवणे बंधनकारक करावे, अशी मागणी गोविंद यादव यांनी केली आहे. पोलीस निरीक्षक डोंगरे यांनी या निवेदनाची दखल घेत शहरातील कॅफ ` चालकांना ठाण्यात पाचारण केले असून हे प्रकार थांबतात काय याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## पुयनी येथील ८२ नागरिकांना आ.डॉ. रत्नाकर गुट्टे यांच्याहस्ते हक्क नोंद प्रमाणपत्राचे वाटप

**पालम,/प्रतिनिधी:** तालुक्यातील मौजे पुयणी येथील आ डॉ रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते ८२ नागरीकांना हक्क नोंद प्रमाण पत्राचे वाटप करण्यात आले तालुक्यातील पुयणी येथील नागरिकांनी



पुनर्ग्रष्टासाठी मागील अनेक दिवसा पासून रमाई तसेच शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेता येत नव्हता त्यांना शासनाच्या विविध योजनेपासून वंचित राहावे लागत होते.
याबाबत ग्रामस्थांनी आ रत्नाकर गुट्टे यांच्या कडे अनेक वेळा आपल्या समस्ये माडल्या होत्या अखेर आमदार रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते पुनर्वसित क्षेत्राचे ८२ कुटुंबांना हक्क प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी पालम तहसीलदार कैलासचंद्र वाघमारे पालम प्रभारी माधवराव गायकवाड, नगरपंचायत नगराध्यक्ष प्रतिनिधी जियाँखान पठान, मिंत्र मंडळाचे विजय घोरपडे, गणेश घोरपडे, बाळासाहेब ढोले, उबेद पठाण, आसद पठाण, शेख गौस, ग्रामसेवक तादळे, तलाठी महसूल प्रशासनाचे कर्मचारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते हक्कनोद प्रमाणपत्रमुळे येथील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण दिसून आले.

## ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे आज अपंग बोर्ड व शत्रक्रिया शिबीर

**जिंतूर,/प्रतिनिधी:** ग्रामीण रुग्णालय जिंतूर येथे आज अपंग बोर्ड व शत्रक्रिया शिबीर संपन्न झाले.

जिंतूर अपंग बोर्ड चं आयोजन आणि बिन टाक्याचे () कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते या शिबीरामध्ये एकूण अपंग रुग्णाची तपासणी करण्यात आली तर ६ महिलांच्या कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करण्यात आल्यात गरजु लाभार्थ्यांनी या शिबारचा लाभ घेतल्या बद्दल नूतन वैद्यकीय अधीक्षक डॉ संजय मस्के यांनी समाधान व्यक्त केले.

दिव्यांग शिबीर,.... महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या गुरुवारी आहे. आज दिनांक २४.१२.२०२५ रोजी एकूण २३ जणांची तपासणी करण्यात आली १९.. पुरुष




०४.. महिला यशवास्वी करण्या साठी डॉ. रुपेश धमगुंडे अस्ती रोग तज्ञ जिल्हा सामान्य रुग्णालय परभणी येथून आले. त्यांना डॉ. मस्के संजय (जोगवाडकर) वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय जिंतूर, डॉ. पारवे वैद्यकीय अधिकारी, श्रीमती पाटोळे सहायक अधीक्षक, श्री. कुलकर्णी कनिष्ठ लिपीक, श्री. गजानन वाळे कक्ष सेवक, श्री. मयूर डाटा एन्ट्री ऑपरेटर व स्टाफ यांनी सहकार्य केले..

## चोरवड गावचा शंतनु देसाई कदम यांची गगनभरारी

**शांतीलाल शर्मा**
**पालम,/प्रतिनिधी:** तालुक्यातील ग्रामीण भागातील चोरवड येथिल शंतनु देसाई कदम यांनी सेल्फ स्टडी व स्वयं अध्ययनावर भर देत कोणतेही क्लासेस न लावता स्वताच्या बुद्धीमतेने आभ्यासावर भर देत २०२४ मध्ये युपी एससी परीक्षेत यश संपादन केले आहे. शंतनु देशाई यांचे पालम तालुक्यातील तांदुळवाडी येथे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद प्राथमिक शाळात झाले तर पाचवी ते दहावी नवोदय विद्यालय व बारावी राज्यश्री शाहू विद्यालय लातूर येथे झाले आहे. त्यानंतर त्यांनी सीओईपी येथून इंजीनियरिंग ची पदवी मिळवली व सेल्फ स्टडी तसेच स्वयं अध्ययनावर भर देत राणीसावरगाव येथे स्वतः घरीच कोणते ही ऑनलाइन क्लासेस तसेच कोनाचेच मार्गदर्शन न घेता यूपीएससी २०२४. यशस्वी रीतीने पास झाले आहे. यापूर्वी तो ईपीएफओ या पदावर लेखा अधिकारी म्हणून कार्यरत होते. हे करत असताना त्यांनी २०२४ ची सिविल सर्विस एक्झामिनेशन. दिली त्यामध्ये तो रिझर्व लिस्ट मधून आय



आर एम एस या पदावर नियुक्त झाले आहे. त्यांनी आयएएस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून निश्चितच ते या प्रयत्नामध्ये येत्या काही वर्षात यशस्वी होतील. या आधुनिक काळातील मोबाईल सारख्या साधनांचा वापर न करता. मनावर पूर्णतः कंट्रोल ठेवून सतत तीन वर्षे अभ्यास करून या उच्च शिखरापर्यंत मजल गाठली आहे. पालम तालुक्यात ग्रामिण भागातील एका छोट्या श्या गावात राहणाऱ्या शांतनु देसाई कदम यांनी जिद्द मेहनतीच्या जिवावर हे शिखर गाठले असुन त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे तसेच त्याच्या या यशात शिक्षक असलेले आई, वडील, तसेच बहीण बी एम एस एम डी डॉक्टर यांचे हि मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थी कष्ट मेहनतीने अशा परीक्षा यशस्वी पणे पार पाडू शकतात आपल्याकडील सर्व पालकांची अशी मानसिकता आहे की, यूपीएससीची परीक्षा देण्यासाठी पुणे,मुंबई, दिल्ली या ठिकाणीच राहावे लागते,त्याशिवाय परीक्षा पास होऊ शकत नाहीत. परंतु ग्रामीण भागातील विद्यार्थी कष्ट मेहनत आणि स्वबळावर अशा परीक्षा यशस्वीपणे पार पाडू शकतात ही यातून सिद्ध होते.यातून निश्चितच ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या परीक्षेसाठी बळ मिळेल अशी अपेक्षा आहे.

## चाटोरी येथिल नाईक विद्या मंदिर महाविद्यालयचे उदघाटन पालक मंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हास्ते संपन्न होणार

**पालम,/प्रतिनिधी-** तालुक्यातील चाटोरी नाईक विद्या मंदिर वसंत नगर प्रा.व मा.व उ.मा.शाळा चाटोरी या नविन ईमारती चे उदघाटन राज्य मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री मेघना दिदी बोर्डीकर यांच्या शुभ हास्ते संपन्न होणार आहे .
या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे रामप्रसाद बोर्डीकर, मा.खा. तुकाराम रेंगे पाटील, मा.खा.संजय जाधव, मा.खा.सुरेशराव जाधव, मा.राज्य मंत्री विनायकराव पाटील, मा.आ.सुरेशराव वरपुडकर, मा.आ.राजेश दादा विटेकर, मा.डॉ. सिध्दार्थजी भालेराव आदी मान्यवर उपस्थित रहानार आहेत हा कार्यक्रम दि. २७ डिसेबर शनिवार रोजी दुपारी १२,३० होनार आहे तरी या महा विद्यालयाच्या उदद्याटन कार्यक्रमाल उपस्थित रहावे असे संस्थापक अध्यक्ष कांतारावजी चव्हाण, मा . जि प सदस्य शांताबाई चव्हाण यांनी केले आहे.

## प्रभाग १२ (ब) मधून पाचव्यांदा पठाण महेमुन्नीसा फैयाज खान विजयी

**रामप्रसाद कंठाळे**
**जिंतूर,/प्रतिनिधी-** नुकत्याच पार पडलेल्या नगरपालिका निवडणुकीत भाजपने एकतर्फी विजय मिळवत नगराध्यक्ष पदी प्रताप देशमुख व २५ पैकी तब्बल १६ नगर सेवक भाजपचे निवडून आल्याने विरोधक चांगलेच तोंडघशी पडल्याचे चित्र समोर आले आहे.

कारण मुख्य प्रतिस्पर्धी माजी आमदार विजय भांबळे यांच्या राष्ट्रवादी अजित पवार गटाचे केवळ पाच नगरसेवक तर नवख्या काँग्रेसने चार नगरसेवक निवडून आणून सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

भाजपच्या प्रताप देशमुख यांना १३१२२ तर राष्ट्रवादी गटाच्या सबिया बेगम कपिल फारूखी यांना ९९५५ मते तर काँग्रेसचे इस्माईल सलीम पहेलवान यांना तब्बल ६२९९ मते पडली.

अख्या परभणी जिल्ह्याचे लक्ष जिंतूर नगर परिषदेच्या निवडणूक निकाला कडे लागलेले असताना पुन्हा एकवेळ माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर व पालकमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात लढवण्यात आलेली ही निवडणूक प्रतिष्ठेची व अटीतटीची समजली गेली. पण शेवटी चाणक्य नीतीने लढवलेली माजी आमदार बोर्डीकर यांच्या मुरब्बी मार्गदर्शनात माजी आमदार विजय भांबळे व सुरेश नागरे यांना पराजाची चांगली चपराक बसल्याचे दिसून आले. कारण यापूर्वी नगरपालिकेवर माजी आमदार विजय भांबळे यांची एक हाती सत्ता होती. व नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांना शहरातून अपेक्षेपेक्षा कमी लीड होती. तरीही या नगर परिषद निवडणुकीत बोर्डीकर यांनी शहराच्या बारा प्रभागात मुस्लिम उमेदवारांना उमेदवारी देऊन आपली पकड मजबूत करत. पालिका आपल्या ताब्यात ठेवण्यात घवघवीत यश मिळवता आले.

### प्रभागातील पाचव्यांदा विजय ही कामाची पावती-टीका खान पठाण





**गत पाच टर्म पासून मिळालेला विजय हा केलेल्या विकास कामाची पावती असल्याचे मत नवनिर्वाचित महैमुनीसा बेगम यांचे सुपुत्र माजी आमदार रामप्रसाद बोर्डीकर यांचे कट्टर समर्थक तसेच सामाजिक कार्यकर्ते टीका खान पठाण व्यक्त केले.**

**प्रभागातील वेळोवेळी असलेला दांडगा संपर्क प्रभगासह शहरात केलेली विकास कामे,तहसील, पंचायत समिती,नगरपालिका,पोलीस स्टेशन,ग्रामीण रुग्णालय आदी ठिकाणच्या नागरिकांच्या कामासाठी तत्परतेने पुढाकार असतो. त्यांनी तब्बल पाच कोटी ७८ लाख रुपयाचा विकास निधी आणून त्यांच्या प्रभागा मध्ये अडीच कोटींचे विविध विकास कामे केली. व उर्वरित विकास निधीतून शहरांच्या विविध भागात आवश्यक त्या ठिकाणी सिमेंट रस्ते व नाल्याची कामे, पथ दिवे,करून मतदारांचे लक्ष वेधले होते. त्यांचे बंधू बासुखा पठाण व मोहसीन खान पठाण यांनीही वेळोवेळी प्रभागातील नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्यासाठी पुढाकार घेत सतत संपर्क ठेवत असतात. नुकत्याच पार झालेल्या या नगरपालिका निवडणुकीत प्रभाग १२ (ब)मधून त्यांनी तब्बल १०२५ मते घेऊन पाचव्यांदा विजय संपादित केला.**

### परभणी जिल्हयात वाढली यावर्षी थंडी

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्हयात यावर्षी थंडी मोठया प्रमाणात जाणवू लागली आहे. डिसेंबर हा महिना संपूर्ण दिवस तापमान हे १० अंशाखाली राहिले आहे. त्यामुळे या थंडीचा परिणाम चांगलाच जाणवू लागलेला आहे. तसेच यावर्षी पावसाचे प्रमाण देखील जिल्हयात चांगलेच वाढलेले होते. त्याचाच परिणाम यावर्षी थंडी जाणवू लागली आहे असे वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापिठाच्यावतीने सांगण्यात आलेले आहे.

## कृषि उत्पन्न बाजार समिती सेलू, ता.सेलू जि.परभणी

जाहिर प्रगटन — दि: १९-१२-२०२५

कृषि उत्पन्न बाजार समिती सेलूच्या कार्यक्षेत्रातील इच्छूक व्यापाऱ्यांना किंवा अन्य इच्छूकांना सुचित करणयात येते की, कृषि उत्पन्न बाजार समिती सेलूच्या मुख्य कापूस यार्डामध्ये बाजार समितीच्या स्वमालकीचा ४० मि टन इलेक्ट्रॉनिक्स भुई जबन काटा व धान्य चाळणी यंत्र ११ महिन्याच्या कालावधी करता. प्रत्येक महिन्या प्रमाणे भाडेतत्वावर किरायाणे दयावयाचे आहे. तरी आपली सिलबंध निविदा सदरील जाहिराती प्रसिध्दी झाल्यापासून (०७) सात दिवसाच्या आत (सुटीचे दिवस वगळता) कार्यालयात ५०० रुपये भरुन आपली नोंदणी करुन घ्यावी.

सदरील आलेल्या सिलबंध निविदा दि.२८/१२/२०२५ वार रविवार शुक्रवार रोजी दुपारी ठिक १२ वाजता उपस्थिता समक्ष उघडण्यात येतील. या कालावधीच्या अटी व शर्ती सेलू बाजार समिती कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर दाखविण्यात आलेली असून अटी व शर्ती कार्यालयात वेळेत (सुटीचे दिवस वगळता) पाहावयास मिळेल.

स्वाक्षरीत/- सचिव | स्वाक्षरीत/- सभापती | स्वाक्षरीत/- उपसभापती

व सर्व संचालक मंडळ, कृषि उत्पन्न बाजार समिती, सेलू

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# बीड हादरलं! प्राथमिक शाळेत रात्रभर रंगतोय 'अनैतिक खेळ'; प्रशासन निद्रिस्त, विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात!

## वडारवाडी शाळेची कुंपणे तोडून समाजकंटकांचा धिंगाणा; मुख्याध्यापक आणि शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२५ डिसेंबर**

तालुक्यातील वडारवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतून एक अत्यंत संतापजनक आणि धक्कादायक प्रकार समोर आला आहे. शाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वच्छतागृहामध्ये वापरलेल्या निरोधच्या पाकिटांचा खच साचलेला पाहायला मिळत आहे. या प्रकारामुळे पालकांमध्ये संतापाची लाट उसळली असून शिक्षण विभागाच्या कारभारावर मोठे प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

नेमका प्रकार काय?

वडारवाडी येथील जिल्हा परिषद शाळा ही गोपाळपूर ग्रामपंचायत अंतर्गत येते. या शाळेत पहिली ते सातवीपर्यंतचे विद्यार्थी शिक्षण घेतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून शाळेच्या स्वच्छतागृहाचा वापर समाजकंटकांकडून अनैतिक कामांसाठी केला जात असल्याचे चित्र समोर आले आहे.



स्वच्छतागृहामध्ये मोठ्या प्रमाणावर निरोधची पाकिटे आणि इतर आक्षेपार्ह वस्तू आढळून आल्या आहेत.

शाळा प्रशासनाचा निष्काळजीपणा?

या गंभीर प्रकाराबाबत स्थानिक सरपंच आणि पालकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सरपंचांनी दिलेल्या माहितीनुसार, शाळेच्या संरक्षणासाठी लावलेले तारेचे कुंपण आणि अँगल तोडून काही उनाड लोक रात्रीच्या वेळी शाळेच्या परिसरात प्रवेश करतात. मुख्याध्यापक आणि शिक्षकांना वारंवार सूचना देऊनही याकडे दुर्लक्ष करण्यात आल्याचा आरोप सरपंचांनी केला आहे. शाळेत कायमस्वरूपी मुख्याध्यापक नसल्याने आणि देखभालीचा अभाव असल्याने असे अनुचित प्रकार घडत असल्याचे बोलले जात आहे.

गटशिक्षणाधिकारी आणि विस्तार अधिकारी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडून कोणताही ठोस प्रतिसाद मिळालेला नाही.

पालकांची मागणी: संबंधित मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी यांच्यावर तात्काळ कठोर कारवाई करण्यात यावी.

आंदोलनाचा पवित्रा: जर प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई केली नाही, तर पालकांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

विद्यार्थ्यांच्या मनावर विपरीत परिणाम करणाऱ्या या प्रकारामुळे पालकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. मुलांच्या भवितव्याचा प्रश्न असून, अशा परिस्थितीत मुलांना शाळेत कसे पाठवायचे? असा सवाल पालकांनी उपस्थित केला आहे.

# माजलगाव भाजपाच्या वतीने इच्छुकांच्या मुलाखतीस उपस्थित राहावे

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.२५ डिसेंबर**

कचरे, सोळंके, रत्नपारखी *दिनांक २६ डिसेंबर २०२५ शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता भारतीय जनता पार्टी माजलगाव संपर्क कार्यालय संभाजी महाराज चौक माजलगाव येथे भाजपाच्या वतीन जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीच्या अनुषंगाने इच्छुकांच्या मुलाखती व पदाधिकारी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यासाठी* बैठक संपन्न होणार आहेत तरी भारतीय जनता पार्टीच्या जिल्हा परिषद पंचायत समिती इच्छुक उमेदवार व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी कीट्टी आडगाव तालुकाध्यक्ष रूपाली कचरे पातरूड मंडळाचे तालुका अध्यक्ष अभिजीत सोळंके माजलगाव शहर मंडळाचे अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी केले आहे. माजलगाव तालुका भाजपाच्या वतीने होणाऱ्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतीस भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख व अक्षय मुंदडा युवा नेते योगेश क्षीरसागर उपस्थित राहणार आहेत. *राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजा मुंडे, मा.खासदार डॉ.प्रीतम मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या बैठकीचे आयोजन केले आहे.

या बैठकीस सर्व भारतीय जनता पार्टीचे जिल्हा परिषद पंचायत समितीच्या इच्छुक उमेदवार व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी २६ डिसेंबर शुक्रवार रोजी दुपारी तीन वाजता वेळेवर उपस्थित रहावे असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे तालुकाध्यक्ष रूपाली कचरे डॉक्टर अभिजीत सोळंके विनायक रत्नपारखी यांनी केले आहे.

# संस्कारमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ डिसेंबर**

संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली/ दुसरी विभागामध्ये वार्षिक स्नेहसंमेलन २०२५ २६ चे उद्घाटन माननीय मु.अ. श्रीमती शोभाताई कुलकर्णी यांच्या हस्ते नुकतेच झाले. हे स्नेहसंमेलन अतिशय आनंदात व उत्साहात संपन्न होत आहे. या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धांमध्ये कला विभागातर्फे चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. बौद्धिक विभागातर्फे 'मनाचे श्लोक 'पाठांतर व स्मरणशक्ती पर आधारित स्पर्धा संपन्न झाली हस्तलिखित विभागातर्फे विविध विषयावर लेखन करणे व कविता लेखन करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे . क्रीडा विभागातर्फे' धावणे' व 'लिंबू- चमचा 'स्पर्धा घेण्यात आल्या आहेत. या स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली दुसरी विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

त्यासोबतच सांस्कृतिक विभागातर्फे भव्य दिव्य असा नृत्य अविष्काराचा कार्यक्रम दिनांक १/१/२०२६ या दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेत नियोजित आहे. या कार्यक्रमासाठी सर्व पालकांना आग्रहाचे आमंत्रण देण्यात आलेले आहे. स्नेह संमेलनाचा समारोप हा दिनांक ३/१/२०२६ या दिवशी स्नेह भोजनाने होणार आहे. सर्व विद्यार्थ्यांना स्नेह भोजनासाठी आग्रहाचे आमंत्रण दिले आहे.नियोजित स्नेहसंमेलन यशस्वीरित्या संपन्न होण्यासाठी संस्कार प्रबोधिनीचे सर्व संचालक मंडळ व स. मु.अ. श्रीमती शोभाताई कुलकर्णी व श्रीयुत व्ही. डी .जोशी सर तसेच सर्व विभाग प्रमुख व शिक्षक वृंद तत्पर आहेत.

# तहसील कार्यालय येथे ग्राहक दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२५ डिसेंबर**

गेवराई तहसील कार्यालय येथे ग्राहक पंचायत महाराष्ट्र व तहसील कार्यालय गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २४ डिसेंबर बुधवार रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन आनंदाने, उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. सर्वप्रथम विवेकानंद प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाले. माननीय ग्राहक तीर्थ बिंदू माधव जोशी यांच्या संघटकाची आष्टाध्यायी पुस्तकाचे प्रकाशन( विमोचन) सर्व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी ग्राहक पंचायत महाराष्ट्र जिल्हा उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी गेवराई ग्राहक पंचायत कार्याचा आढावा उपस्थिता समोर मांडण्यात आला. ग्राहकाने मोठ्या प्रमाणात संघटन करून आपल्या सेवा उपलब्ध करून घेणे काळाची गरज आहे. त्यासाठी ग्राहक पंचायत कार्यात सर्वांनी सहभागी होणे गरजेचे आहे असे सांगितले. तसेच प्राचार्य डॉ. विजयकुमार बांदल यांनी ग्राहक संरक्षण कायदा १९८६ बद्दल सविस्तर माहिती दिली. ग्राहक संरक्षण कायद्याचा जास्तीत जास्त ग्राहकाने लाभ घेणे गरजेचे आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुधीर जोशी व आभार प्रदर्शन नायब तहसीलदार पुरवठा श्री गजानन मोरे साहेब यांनी केले.

या कार्यक्रमास ग्राहक पंचायत पदाधिकारी बीके तावस्कर, विश्वास चपळगावकर, वल्लभ तौर, योगेश कापसे, पांगरे तात्या आदी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# सुशासनाचा विश्वास , थेट संवादाचा धागा : आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहांतर्गत मंडळ स्तरीय आढावा बैठक

**तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचा स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ डिसेंबर**

पाली महसूल मंडळात आहेर वडगाव येथे सुसाशन सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेली मंडळ स्तरीय आढावा बैठक ही केवळ प्रशासकीय औपचारिकता न राहता थेट जनतेशी संवाद साधणारी , विश्वास निर्माण करणारी आणि शासन - प्रशासन - जनता या त्रिसूत्रीला बळ देणारी ठरली . ग्रामपंचायत कार्यालयाच्या सभागृहात शेतकरी , ग्रामस्थ , लोकप्रतिनिधी , महसूल व इतर विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते . प्रशासन गावाकडे या संकल्पनेचा प्रत्यय देत समस्या ऐकणे , मार्गदर्शन करणे आणि तात्काळ उपाययोजना सुचवणे हा या बैठकीचा केंद्रबिंदू ठरला .

राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनांनुसार महसूल विभागाचे निर्णय हे केवळ कार्यालयापुरते न राहता थेट गावपातळीवर पोहोचावा , सामान्य नागरिकांच्या समस्या गावातच सोडवाव्यात , हा स्पष्ट संदेश देण्यात आला आहे . त्याच अनुषंगाने छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली विभागभर सुसाशन सप्ताहाची प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे .

बीड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे सातत्याने या उपक्रमाचा आढावा घेत असून , जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात लोकाभिमुख प्रशासन पोहोचावे , नागरिकांना वेळेत सेवा मिळावी , यासाठी त्यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी तसेच उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही वेळोवेळी बैठका घेऊन , महसूल यंत्रणेला जनतेशी थेट संवाद साधण्याच्या सूचना दिल्या असून , त्याचाच प्रत्यय या मंडळ स्तरीय बैठकीतून आला .

या बैठकीचे नेतृत्व तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी केले . त्यांनी औपचारिक भाषणांऐवजी थेट लोकांमध्ये बसून शेतकरी व ग्रामस्थांच्या अडीअडचणी ऐकून घेतल्या . पाणी , शेती , महसूल दाखले , ओळखपत्रे , विविध योजना , अनुदाने , अ‍ॅग्रीस्टॅक , पीकविमा , जमीन विषयक प्रश्न यावर त्यांनी शांतपणे आणि मुद्देसूद मार्गदर्शन केले . त्यांच्या या लोकाभिमुख भूमिकेमुळे बैठकीला वेगळीच उंची प्राप्त झाली .

या आढावा बैठकीस सरपंच सुशेन खरसाडे ( आहेर वडगाव ) , सरपंच रमेश भोसले ( कोल्हारवाडी ) , उपसरपंच अभिराज रांजवन ( आहेर वडगाव ) , उपसरपंच अशोक सिंघन ( कोल्हारवाडी ) , बाबुराव गोरे ( सदस्य , समनापुर ) हे लोकप्रतिनिधी उपस्थित होते . तसेच पोलीस पाटील सखाराम काटे ( आहेर वडगाव ) , अंगद गोरे ( समनापुर ) , अरुण काटे ( राशन दुकानदार , आहेर वडगाव ) , गिरजाप्पा रोहिटे , मंडळ अधिकारी शीतल चाटे , ग्राम महसूल अधिकारी अनिल गायकवाड ( पाली ) , जितेंद्र शेळके ( आहेर वडगाव ) , राजाभाऊ गायकवाड ( मोची पिंपळगाव ) , राधिका बहिर ( वांगी ) , मीनल खांदे ( कोळवाडी ) , कृषिसहाय्यक सरिता शिंदे , आशा सेविका तसेच पंचक्रोशीतील मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते .

सुसाशन सप्ताहाच्या निमित्ताने शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती देण्यात आली . तसेच प्रमाणपत्रे , दाखले , ऊसतोड कामगार ओळखपत्र , धरणग्रस्त प्रमाणपत्र , श्रावण बाळ योजनेचे लाभपत्र , कुणबी दाखले , डोमेसाइल प्रमाणपत्र , फार्मर आयडी यांचे लाभार्थ्यांना थेट वाटप करण्यात आले . लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर दिसणारा समाधानाचा भाव हा या कार्यक्रमाचा खरा यशस्वी निष्कर्ष ठरला .

# नानाजी देशमुख विद्या मंदिर ची एक दिवसीय सहल संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ डिसेंबर**

दिनांक २४/१२/२०२५ वार बुधवार रोजी सकाळी ठीक ७:३०वाजता सहली साठी शाळेतून निघालो. सर्वप्रथम शनिशिंगणापूर येथे शनी दर्शनासाठी गेलो. हे अहमदनगर जिल्ह्यातील प्रसिद्ध मंदिर आहे. जिथे शनिदेव स्वयंभू पाषाण स्वरूपात उघड्यावर विराजमान आहेत. या मंदिराची खासियत म्हणजे इथे घरांना कुलूप नसतात साक्षात शनिदेव चोरांपासून रक्षण करतात अशी श्रद्धा आहे. इथे दर्शन झाल्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रसाद घेतला, नाश्ता देण्यात आला. यानंतर देवगड साठी निघालो. इथे प्रवरा नदीच्या काठावर वसलेले क्षेत्र दत्त मंदिर आहे. या मंदिराचे भव्य आणि सुंदर वास्तुकला, राजस्थानी संगमरवरी



दगडांनी बांधकाम, आकर्षक नक्षीकाम असे या मंदिराचे मुख्य आकर्षण आहे. इथे दत्त महाराजांचे दर्शन घेतल्यानंतर विद्यार्थ्यांनी एकत्र सहभोजनाचा आनंद घेतला. नंतर विद्यार्थ्यांनी मनसोक्त खरेदीचाही आनंद लुटला. यानंतर नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराजांचे ठिकाण पाण्यासाठी गेलो. संत ज्ञानेश्वर महाराजांनी हिरव्या शतकात ज्या खांबाला टेकून ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहिला तो खांब आजही तिथे पैस खांब या नावाने ओळखला जातो. हे या मंदिराचे प्रमुख आकर्षण आहे. अशी माहिती सुनंदा ताईंनी विद्यार्थ्यांना सांगितली इथे एकत्रित पसायदान घेण्यात आले. यानंतर गाडी बीडच्या दिशेने निघाली. अशाप्रकारे ही सहल आनंदात आणि उत्साहात पार पडली. या सहलीच्या प्रमुख स्नेहल गोसावी या होत्या. या सहलीसाठी डॉ. सीमाताई जोशी, गंगाधरजी देशमुख सर, सुनंदाताई कुलकर्णी, अर्चना ताई मोराळे, आरती ताई जोशी यांचे मार्गदर्शन मिळाले. ही सहल यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य मिळाले.

# कवी मनाचे अटलजी राजकारणातील नैतिकतेचे आदर्श – डॉ. बाहेगव्हाणकर

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ डिसेंबर**

उत्कृष्ट वक्ते महान कवी असलेलेत्न माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी हे राजकारणातही नीतिमत्तेचे आदर्श होते असे प्रतिपादन उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर यांनी केले.येथील स्वा. सावरकर महाविद्यालयात भारतरत्न माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे हे होते तर व्यासपीठावर उपप्राचार्य डॉ. उत्तम साळवे, डॉ संगीता ससाने यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की भारतीय राजकारणामध्ये स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांची पंतप्रधान पदाची कारकीर्द अविस्मरणीय राहिली, त्यांच्याच कार्यकाळात पोखरण येथे अनुस्फोट करून भारताने आपली ताकद जगाला दाखवून दिली. अटल बिहारी वाजपेयी उत्कृष्ट वक्ते, महान कवी होते.पत्रकार म्हणूनही त्यांची वेगळी ओळख होती.भारतीय जनता पक्षाची स्थापना झाल्यानंतर ते पहिले अध्यक्ष बनले. अध्यक्ष समारोपात प्राचार्य डॉ. सुहास मोराळे म्हणाले की राजकारणात आणि



समाजकारणात अटल बिहारी वाजपेयी एक आदर्श होते.त्यांनी कधी तत्वाशी तडजोड केली नाही. भारतीय राजकारणाला एक वेगळी दिशा देण्याचे काम त्यांनी केले.या वेळी मान्यवरांच्या हस्ते भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक डॉ. संगीता ससाने यांनी केले तर सूत्रसंचालन प्रा. संजय काळे यांनी केले.कार्यक्रमाला महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# खो-खो स्पर्धेसाठी बीड जिल्ह्याचा संघ मुंबईकडे रवाना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२५ डिसेंबर**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशन यांच्या मान्यतेने, मुंबई खो-खो संघटनेच्या विद्यमाने तसेच लायन्स क्लब ऑफ दादर ज्वेल्स यांच्या सहकार्याने श्री समर्थ व्यायाम मंदिर, दादर यांच्या शताब्दी वर्षानिमित्त आयोजित ३९ वी किशोर-किशोरी राज्य अजिंक्यपद व निवड खो-खो स्पर्धा २०२५-२६ दि. २५ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत भारतीय क्रीडा मंदिर, सहकार नगर जवळ, वडाळा, मुंबई येथे आयोजित करण्यात आली आहे.

या प्रतिष्ठित राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागासाठी निवड झालेला बीड जिल्ह्याचा किशोर-किशोरी खो-खो संघ मुंबईकडे रवाना झाला आहे. या स्पर्धेसाठी निवड झालेल्या स्पर्धकांना शुभेच्छा देण्यासाठी आयोजित कार्यक्रमात शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते तथा संस्थेचे सचिव प्रा. जे. पी. शेळके, खो-खो संघटनेचे अध्यक्ष ऋषिकेश शेळके, उपाध्यक्ष रमेशभाऊ शिंदे, सचिव विजय जाहेर, योगेश सोळसे, मनोज जोगदंड, प्रफुल्ल हाटवटे, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीमती कदम एस. डी., प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर. टी. राऊत, राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीमती आर. डी. लोखंडे तसेच उपस्थित सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवृंद उपस्थित होते.

यावेळी मान्यवरांनी स्पर्धकांना मार्गदर्शन करताना शिस्त, संघभावना व क्रीडास्पिरीट जपत उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून यश संपादन करण्याचा सल्ला दिला व संघाच्या उज्ज्वल यशासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

या स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंची नावे पुढीलप्रमाणे :

जगताप वर्षा, चौधरी संस्कृती, धस नम्रता, धस अनुजा, जागडे श्रावणी, सय्यद अलमास, धस समृद्धी, सोले देवयानी, सोले मोनिका, बोरगे नंदिनी, येवले कार्तिकी, काकडे श्रद्धा, कारे श्रद्धा, अंधारे ममता, पांचाळ गौरी, शिंदे आदित्य, मनतारे यश, तांबारे समर्थ, जाधव श्रेयश, गाडे वेदांत, गजरे अविष्कार, खरात सौरभ, चौरे हर्ष, कुंड यशविर, राठोड सार्थक, धायगुडे वरद, बनसोडे यश, घाडगे अनुज, धस सोहम, धस रुद्र.संघाच्या मार्गदर्शनासाठी प्रशिक्षक गायकवाड अंकुश व भरत यादव, व्यवस्थापक कुलकर्णी सुचिता, चव्हाण नवनाथ यांची नियुक्ती करण्यात आली आहे.बीड जिल्ह्याचा हा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत घवघवीत यश संपादन करेल, असा विश्वास यावेळी मान्यवरांनी व्यक्त केला.

# हिंगोलीत नवनिर्वाचित नगराध्यक्षासह नगरसेवकांचा नगर पालिकेत सत्कार

## नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांनी स्विकारला पदभार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

हिंगोली नगर पालिका निवडणुकीत शिवसेनेच्या नगराध्यक्षा सौ. रेखा श्रीराम बांगर यांच्यासह शिवसेनेच्या १७ नगरसेवक तसेच इतर पक्षाच्या नवनिर्वाचित नगर सेवकांचा सत्कार नगर पालिकेच्यावतीने येथील नगर पालिकेच्या नवीन सभागृहात करण्यात आला. यावेळी नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांनी नगराध्यक्षपदाचा पदभार स्विकारला.

हिंगोली नगर पालिकेवर शिवसेनेने निर्विवाद वर्चस्व मिळवत नगराध्यक्षपदी सौ रेखा श्रीराम बांगर यांची तर शिवसेनेचे १७ नगरसेवक निवडून आणले. राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट, काँग्रेस, भाजप पक्षाच्या नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार गुरूवारी येथील नगर पालिकेत आयोजित करण्यात आला होता. या सत्काराला भाजपचे नगरसेवक उपस्थित राहीले नाही मात्र इतर पक्षांचे नगरसेवक उपस्थित होते. विशेष म्हणजे या सर्व सत्कारामध्ये महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

या कार्यक्रमाचे आयोजन मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी केले होते. नगराध्यक्षा सौ रेखा बांगर यांचे आगमन होताच नगर पालिका कार्यालयासमोर ढोल ताशांच्या गजरात नवनिर्वाचित नगराध्यक्षा बांगर व नगरसेवक यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. नगर पालिकेने दोन दिवसातच नगर पालिका कार्यालयातील वरच्या मजल्यावर सभागृह नगराध्यक्षांचे कक्ष सुसज्ज करून ठेवले होते. फर्निचरसह इतर सुविधाही या सभागृहात आणि कक्षामध्ये देण्यात आल्या आहेत.

या कार्यक्रमास माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, आ. संतोष बांगर, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीराम बांगर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी सर्व मान्यवरांना भगवे फेटे घालण्यात आले. त्यानंतर मुख्याधिकारी अरविंद मुंडे यांनी नवनिर्वाचित नगराध्यक्षा रेखा बांगर यांचा सत्कार केला. त्यानंतर शिवसेना, राष्ट्रवादी तसेच काँग्रेसच्या विजयी नगरसेवकांचाही सत्कार करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षा रेखा बांगर यांनी नगराध्यक्षपदाचा पदभारही स्विकारला. पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी प्रतिक्रीया देतांना हिंगोली शहराच्या विकासासाठी आम्ही कटीबध्द असून नागरिकांना दिलेली आश्वासने तसेच मुलभूत सुविधा, स्वच्छ शहर सुंदर शहर ही संकल्पना राबविली जाणार आहे. प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी स्वतंत्र कक्ष स्थापन करणार. यावेळी राष्ट्रवादीचे नगरसेवक तथा माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांनी नूतन नगराध्यक्षा रेखा बांगर यांचा सत्कार केला. यावेळी माजी उपनगराध्यक्ष हाजी शेख निहाल, राम कदम, आमेर अली, सुखदेव बलखंडे, कय्यूम पठाण, गणेश बांगर आदींची उपस्थिती होती.

# आदर्शमध्ये अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

येथील आदर्श शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात भारताचे माजी पंतप्रधान, भारतरत्न, स्व. अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अटल बिहारी वाजपेयी यांच्या जी-वनावर प्रकाश टाकताना, ज्येष्ठ संसदपटू असलेले अटल बिहारी वाजपेयी राजकारणात चार दशक सक्रीय होते. ते नऊ वेळा लोकसभेवर तर दोन-वेळा राज्यसभेवर निवडून आले होते. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे अंतर्गत व परकीय धोरणास आकार देण्यात भारताचे एक पंतप्रधान, परराष्ट्र मंत्री, विविध स्थायी समित्यांचे अध्यक्ष व एक विरोधी पक्ष नेते म्हणून त्यांनी समर्थपणे भूमिका बजावली होती. भारताच्या अर्थव्यवस्थेची दूरदृष्टीनं केलेली आखणी, पायाभूत सोयीसुविधांचे असंख्य प्रकल्प, राष्ट्रीय महामार्गांचा विकास असा समृद्ध वारसा अटल बिहारी वाजपेयी यांनी देशाला देऊन गेले आहेत. राजकारणी, कवी आणि एक थोर वक्ता म्हणून अटलजींनी भारतीय जनमानसावर आपली एक वेगळीच छाप सोडली आहे. असे विचार या कार्यक्रमाप्रसंगी मांडण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती स्टाफ सचिव प्रा. डॉ. सचिन हाटकर, प्रा. डॉ. अण्णाजी मडावी, प्रा. धृपद हारे, प्रा. डॉ. सोपान खरात, प्रा. डॉ. सुभाष पोले, शामराव ठोंबरे, रामकिशोर ठाकुर, सुधिर बांगर, सोहेल पठाण इत्यादी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

# आ. मुटकुळेंनी घेतली नूतन एस पी नीलभ यांची भेट



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

भारतीय जनता पक्षाचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दि २५ डिसेंबर रोजी नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांची भेट घेतली. ही भेट सदीच्छा भेट असल्याचे वरवर सांगत असले तरीही नुकत्याच झालेल्या नगर पालिका निवडणुकीनंतर आ. मुटकुळे यांनी पोलिस अधीक्षक नीलभ यांची भेट ही चर्चेचा विषय बनली आहे.

हिंगोली नगर पालिकेवर भाजपची सत्ता असूनही शिवसे-नेचे कळमनुरीचे आ. संतोष बांगर यांनी हिंगोली नगर पालिकेवर स्वत: भावाच्या पत्नी सौ रेखा श्रीराम बांगर यांना नगराध्यक्षपदी निवडून आणले तसेच भाऊ श्रीराम बांगर यांच्यासह १७ नगरसेवकांना निवडून आणण्यात सिंहाचा वाटा उचलला. हा पराभव भारतीय जनता पक्षाच्या चांगलाच जिव्हारी लागला असून शहरात अनेक विकास कामे करूनही जनतेने का नाकारले याचे चिंतन करीत आहे. विजयानंतर आ. संतोष बांगर यांनी मिरवणूकीत दंड थोपटत विरोधकांना पुन्हा एकदा आव्हान दिले आहे. आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकांमध्येही असाच धक्का देणार असल्याचे त्यांनी पत्रकारांसमोर सांगितले. जिल्हा परिषदेवर शिवसेनेचा झेंडा फडकविणार असल्याचा दावाही आ. बांगर यांनी केला आहे.

दरम्यान, दि २५ डिसेंबर रोजी भाजपचे आ. तान्ह-ाजीराव मुटकुळे यांनी नूतन पोलिस अधीक्षक नीलभ रोहन यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत पदाधिकारी व कार्यकर्ते होते परंतु स्वागतानंतर त्यांनी मात्र पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह पत्रकारांना बाहेर पाठवून पोलिस अधीक्षकांशी काही महत्वाच्या विषयावर चर्चा केल्याचे दिसत आहे. याचे पडसाद काय उमटणार हे लवकरच पोलिस अधीक्षक यांच्या कारवायानंतर लक्षात येईल.

# सौ. रेखा श्रीराम बांगर यांनी नगराध्यक्षपदाचा पदभार स्विकारला



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

नवनिर्वाचितनगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांनी गुरूवारी येथील नगर पालिकेतील नवीन सभागृहाचे उद्घाटन केल्यानंतर नगराध्यक्षपदाचा पदभार स्विकारला.

येथील नगर पालिकेच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ रेखा श्रीराम बांगर यांचा नगर पालिका प्रशासनाकडून भव्य सत्कार करण्यात आला. पहिल्यांदाच थेट जनतेतून महिला नगराध्यक्षा निवडून आल्या आहेत. यावेळी महिला नगरसेविकांची लक्षणीय उपस्थिती होती. महिला नगराध्यक्षा सौ रेखा बांगर यांनी नगराध्यक्षपदाचा पदभार स्विकारला. यावेळी शिवसेनेचे आ. संतोष बांगर, माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर, मुख्याधिकारी अरविंद मुंडे, शाम माळवटकर यांच्यासह सर्व नगरसेवक तसेच कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त

### जनतेच्या समस्या वेळेवर सोडवा- माचेवाड



औंढा नागनाथ- औंढा नागनाथ तालुक्यातील पुरजळ येथे सुशासन दिनानिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्याप्रसंगी उपजिल्हाधिकारी अनिल माचेवाड यांनी जनजेच्या समस्या अधिकारी व कर्मचारी यांनी वेळेवर सोडविण्याचे आ-वाहन केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच श्रीमती म गर होत्या. मान्यवरांच्याहस्ते विविध प्रकारचे प्रमाणपत्रे वाटप करण्यात आले. तसेच शिधापत्रिका, जिवंत सातबाराचे अर्ज संकलन, अनुदान, पुरवठा, निराधार, आरोग्य तपासणी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरूवात छ.शिवाजी महाराज, डॉ बाबासाहेब आंबेडकर महात्मा गांधी यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी निवडणूक नायब तहसीलदार वैजनाथ भालेराव, मंडळ अधिकारी काळे, आरोग्य विभागांचे अधिकारी, कर्मचारी पुरवठा, तलाठी, सेतू सुविधा केंद्र चालक, माजी जिल्हा परिषद सदस्य विठ्ठल सातपुते, ग्रामस्थ उपस्थित होते.

### कंत्राटीपदाच्या मुलाखतीस अनुपस्थित उमेदवारांना ३० डिसेंबर रोजी एक संधी

हिंगोली- राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत हिंगोली जिल्ह्या-तील कंत्राटी पद्धतीने पदे भरण्यासाठी जाहिरात क्र. ०१/२०२५ दिनांक १६ सप्टेंबर २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानुसार विहित मुदतीत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करून पात्र ठरलेल्या उमेदवारांना दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी मुलाखतीसाठी बोलविण्यात आले होते. या मुलाखतीसाठी मोठ्या प्रमाणावर उमेदवार अनुपस्थित राहिल्याने अशा अनुप-स्थित उमेदवारांना एक अतिरिक्त संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, हिंगोली यांच्या दालनात मुलाखती आयोजित करण्यात आल्या आहेत. मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांनी शैक्षणिक अर्हतेची मूळ कागदपत्रे, अनुभव प्रमाणपत्र, अतिरिक्त शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे व इतर आवश्यक कागदपत्रांसह वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. दरम्यान, दिनांक २३ डिसेंबर २०२५ रोजी मुलाखतीसाठी उप-स्थित राहिलेल्या उमेदवारांनी दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी होणाऱ्या मुलाखतीसाठी उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, असे राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या जिल्हास्तरीय पदभरती समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके यांनी स्पष्ट केले आहे.

# शेतकऱ्यांनी शेतीसाठी महाविस्तार एआय ॲपचा वापर करावा- जाधव

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प, मुंबई व कृषी विभाग महाराष्ट्र शासन तुमचे संयुक्त विद्यमाने विकसित महाविस्तार ए आय अँप प्रचार प्रसिद्धी व अँप नोंदणीची मोहीम कृषी विभागामार्फत राबवल्या जात आहे. या मोहिमेचा एक भाग म्हणून रेनापुर येथे आयोजित कार्यक्रमांमध्ये तालुका कृषी अधिकारी बोलत होते. तालुक्यातील रेणापूर सह २९ गावांची निवड पोकरा या योज-नेमध्ये झाली असून या योजने योजनेची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचवण्यासाठी रेनापुर येथील शेतकरी बचत गटामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कळमनुरी तालुका कृषी अधिकारी के.एम. जाधव हे होते. कोकरा योजनेमध्ये समाविष्ट सर्व बाबींची इत्यंभूत माहिती उपअधिकारी भोजे यांनी उपस्थित शेतकऱ्यांना दिली. शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, त्यासाठी विकसित महाविस्तार ए आय ॲप वापरण्यासंबंधी मौलिक सूचना केल्या. त्यामध्ये पीक सल्ला, मृदा आरोग्य, खतमात्रा, हवामानास अनुकूल शेती पद्धती, किड व रोग नियंत्रण, बाजार भाव, डीबीटी व गोदाम इत्यादी बाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच मंडळ कृषी अधिकारी अनिल लेकुळे यांनी योजनेतून तु-षार सिंचन, ठिबक सिंचन, शेडनेट, पॅक हाऊस, शेततळे, मत्स्यपालन याबद्दल शेतकऱ्यांना सविस्तर माहिती दिली. कृषी सेवक सुरेश शृंगारे व सहाय्यक कृषी अधिकारी कु. ज्योती कदम यांनी पोकरा अंतर्गत आत्मा गट तयार करण्यासाठी विशेष परिश्रम घेऊन शेती शाळेच्या माध्यमातून आधुनिक शेतीच्या संकल्पना शेतकऱ्यांना समजून दिल्या. याप्रसंगी गावातील शेतीनिष्ठ शेतकरी व दत्त मंदिर संस्थांचे सचिव अश्विन पतंगे यांनी बदलत चाललेल्या निसर्गचक्राचा शेतीवर होणारा दुष्परिणाम थांबविण्याच्या दृष्टीकोनातून शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी दत्त मंदिर संस्थानचे अध्यक्ष बाबाराव शृंगारे, तंटामुक्ती अध्यक्ष सुभाषराव शृंगारे, पोलीस पाटील माधवराव पतंगे, हनुमान पतंगे, वीरेंद्र शृंगारे, फुलाजी पतंगे, प्रभाकर पतंगे, भिकाजी शृंगारे, साहेबराव शृंगारे, त्र्यंबक शृंगारे व मधुकर पतंगे यांच्यासह अनेक शेतकरी बांधवांची उप-स्थिती होती.

# महाज्योतीमार्फत जेईई, नीट विद्यार्थ्यांना योजनेंतर्गत ३४ टॅबचे वाटप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (म हाज्योती) यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या जेईई, नीट, एमएचटी-सीईटी २०२५-२७ परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेअंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील निवड झालेल्या ३४ विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमास इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक यादव गायकवाड यांच्यासह महाज्योती कार्यालयाकडून टॅब वाटपासाठी निवड झालेले विद्यार्थी व त्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांच्या हस्ते म हापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर महाज्योतीमार्फत जेईई, नीट, एमएचटी-सीईटी २०२५-२७ परीक्षा पूर्व प्रशिक्षण योजनेअंतर्गत निवड झालेल्या ३४ विद्यार्थ्यांना टॅबचे वाटप करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांना टॅबचा शैक्षणिक वापर कसा करावा, ऑनलाईन अध्ययन, अभ्यासक्रम व परीक्षेच्या तयारीसाठी टॅबचा प्रभावी उपयोग याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच पालक वर्ग उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी या कार्यालयातील सहायक लेखा अधिकारी किशोर महाजन, निरीक्षक मनिष राजुलवार, बालाजी टेंभुर्णे, वरिष्ठ लिपिक भास्कर वाकळे, ग्रंथपाल बाळु पवार, श्रीमती श्रध्दा तडकसे, जयदीप देशपांडे, प्रतिक सरनाईक, श्रीमती दिप-ाली सोनकांबळे, श्रीमती उखा मुरकुटे, श्रीमती विना कोकणी, प्रफुल चवरे, सचिन टाले, मारोती इंगळे, निरज राठोड, विश्वनाथ खोकले, संतोष गलांडे यांनी परिश्रम घेतले.

# शहरात ख्रिसमस सण उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ डिसेंबर**

शहरातील सेक्रेड हार्ट इंग्लीश स्कुल, एबीएम इंग्लीश स्कुल तसेच पवार पब्लीक स्कुलमध्ये ख्रिसमस दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

ए बी एम इंग्लिश हायस्कूल येथे ख्रिसमस सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्थेचे अध्यक्ष दिलीप बांगर, मुख्याध्यापक जोसेफ के जे उपमुख्याध्यापक आदेश बोराळकर यांची उपस्थिती होती. या कार्यक्रमांमध्ये अनेक विद्यार्थ्यांनी वेग-वेगळे कलागुण सादर केले ख्रिसमस निमित्त-ाने कॅरॉल सिंगिंग, डान्स, सांताक्लॉजची वेशभूषा करत वेगवेगळ्या ॲक्टिव्हिटी सादर केल्या तसेच ख्रिसमस ट्रीचे डेकोरेशन केले व ख्रिसमस सणाबद्दल शाळेच्या शिक्षिका नेहा बाबू यांनी माहितीही दिली. या निमित्ताने स्पर्धांची आयोजन केले होते तसेच या सणानिमित्त संदीप जोंधळे व त्यांचा ग्रुप यांनी उत्कृष्ट नृत्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन पायल सोनी यांनी केले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.



शहरातील अंबिका नगरात असलेल्या पवार पब्लिक स्कूलमध्ये नाताळ सण हा गुरुवारी असताना त्या पूर्व संधेला बुधवारी साजरा करण्यात आला.

यावेळी सर्व मुलांनी लाल व पांढऱ्या कलर मधील कपडे परिधान करत तसेच सांताक्लॉज बनवून लहान मुलांनी सण साजरा केला. यावेळी मुलांनी गाण्यावर नृत्य सादर करत प्रेक्षकांचे मन जिंकले. तसेच नाताळ सण साजरा करण्यात विद्यार्थ्यांनी वर्गखोल्या तसेच शाळेला सजवून काढले. मुलांनी बनवले-ले ख्रिसमस ट्री आकर्षणाचा भाग ठरला. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार, कोमल अग्रवाल, सॉली केसी, दीपाली राऊत, अपर्णा जामकर, दिपाली मुदिराज, ठाकरे, धनवे, फिजा सय्यद, सचिन धामणे, पंकज इंगोले, सचिन इंगोले, योगेश थोरात, गजानन वानरे, जॉबीन, पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर, आदींची उपस्थिती होती.

# शिरड शहापूरात भटक्या कुत्र्यांचा विद्यार्थ्यावर हल्ला

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ २५ डिसेंबर**

औंढा नागनाथ तालुक्यातील शिरडशहापूर येथे पिसाळलेल्या कुत्र्याने विद्यार्थ्यांवर हल्ला केला. जखमी विद्यार्थ्याला हिंग-ोली येथील सामान्य रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. तत्काळ पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी वंचीतच्यावतीने करण्यात आली आहे.

शिरडशहापूर येथे सोहम संतोष ठाकरे हा विद्यार्थी अंगणात अभ्यास करीत बसला होता. अचानक भटक्या कुत्र्यांनी त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात सोहम जखमी झाला असून त्याला येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारानंतर हिंगोली येथील जिल्हा सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्याच्यावर जिल्हा रूग्णालयात उपच-ार सुरू आहेत. या घटनेमुळे शहरात भितीचे वातावरण पसरले आहे. यापूर्वीही शिरड शहापूर येथे अनेकांना भटक्या कुत्र्यांनी चावा घेतला आहे. शहरात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून ग्रामपंचायत व तालुका प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे गावात भटक्या कुत्र्यांसह डुकरांचा वावर वाढला आहे. तत्काळ भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा अन्यथा वंचीत बहुजन आघाडीच्यावतीने तीव्र आंदोलन करण्याचा इश-ारा वंचीतचे जिल्हाध्यक्ष अनिल कांबळे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू: जवळा मुरार येथील

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २५ डिसेंबर-**

मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार येथे धक्कादायक घटना घडली असून या गावातील एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. दोन मुलांनी रेल्वेखाली उडी मारून आपलं आयुष्य संपवलं तर त्यांचे आई-वडील घरात मृतावस्थेत आढळले. त्यामुळे या घटनेबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.



मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावात राहणाऱ्या लखे कुटुंबातील ही घटना आहे. या घटनेमुळे नागरिकांमध्ये संभ्रमाचं वातावरण आहे. एकाच कुटुंबातील चार जणांच्या आयुष्याचा अशा धक्कादायक पद्धतीने अंत झाल्याने अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. या चौघांनी आत्महत्या केली की काही घातपात झालाय, याविषयी पोलिसांचा तपास सुरू आहे.

नांदेडच्या मुदखेड तालुक्यातील जवळा मुरार गावात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला आहे. या घटनेनंतर जवळा मुरार गावात पोलिसांचा मोठा बंदोबस्त पहायला मिळत आहे. एकाच कुटुंबातील चौघांच्या मृत्यूमागील कारण काय आहे, याचा पोलिसांकडून तपास सुरू आहे. बजरंग रमेश लखे (वय २२) आणि उमेश रमेश लखे (वय २५ वर्षे) या दोन सख्ख्या भावांनी मुगट रेल्वे स्थानक परिसरात रेल्वेखाली उडी मारून आपलं आयुष्य संपवलंय. तर दुसरीकडे त्यांचे वडील रमेश होनाजी लखे (वय ५१) तर आई राधाबाई रमेश लखे (वय ४४) हे दोघे त्यांच्या घरात मृतावस्थेत आढळले. मोठा मुलगा उमेश लखे हा मनसेचा मुदखेडचा माजी तालुका उपाध्यक्ष असल्याची माहिती समोर येत आहे. तर सामाजिक कार्यातही उमेशचा सक्रिय सहभाग होता.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बजरंग, उमेश, रमेश आणि राधाबाई लखे या चौघांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहेत. या चौघांचे कोणाशी वाद होते का, कौटुंबिक वादातून असं टोकाचं पाऊल उचललंय का किंवा त्यांचा घातपात झालाय का, याचा तपास पोलीस करत आहेत.

पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलिस अधिकारी अर्चना पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी डि. एस.पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी डॅनियल बेन,नायब तहसीलदार मारुती जगताप, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय मंठाळे, सहायक पोलिस उपनिरीक्षक बुक्तरे यांनी तासभर जवळा मुरार येथे घटनेची माहिती घेतली फॉरेंसिक लॅबही घटनास्थळी हजर होती अशी घटना तालुक्यात पहिल्यांदाच घडल्याने परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# तरुण भारतच्या बातमीची तरुणांनी घेतली दखल; प्रशासन जागे झाल्यास कायमस्वरूपी तोडगा निघणार!

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २५ डिसेंबर-**

देगलूर तालुक्यातील होट्टल रस्त्यावर अवघ्या चार दिवसांत पाच अपघात; एक ठार, अनेकजण जखमी या मथळ्याखाली दि. २२ डिसेंबर २०२५ रोजी तरुण भारत दैनिकात प्रसिद्ध झालेल्या बातमीची दखल आता स्थानिक तरुणांनी घेतली आहे. मात्र, ही समस्या कायमस्वरूपी सुटण्यासाठी प्रशासनाने तातडीने पुढाकार घेणे अत्यावश्यक असल्याची भावना जनतेकडून व्यक्त केली जात आहे.







होट्टल रस्त्यावर लिंगनकेरुर जवळील चढावाचा रस्ता अतिशय धोकादायक बनला असून येथे अपघातांची मालिका सुरूच आहे. या ठिकाणी रस्त्याला तटबंदी नसणे, अतिवृष्टीमुळे रस्ता खचलेला असणे आणि योग्य दिशादर्शक फलकांचा अभाव यामुळे वाहनचालकांसाठी हा मार्ग जीवघेणा ठरत आहे. या गंभीर परिस्थितीची दखल घेत परिसरातील शिवाजी सूर्यवंशी, राजूभाऊ दासरवाड, कैलास गाडीवान, ओमकार पाटील, गंगाधर पाटील, सतीश डांगे, गणेश पवार, बालाजी सूर्यवंशी आदी सजग तरुणांनी स्वखर्चातून तातपुरते उपाय करण्यास सुरुवात केली आहे. धोकादायक ठिकाणी ठेवण्यात आलेल्या दगडांवर लाल रंगाचे स्टिकर्स लावून 'धोका आहे' अशी स्पष्ट निशाणी करण्यात आली आहे, जेणेकरून वाहनचालक सावध राहतील आणि पुढील अपघात टाळता येतील.




या तरुणांनी सांगितले की, या समस्येबाबत प्रशासन व लोकप्रतिनिधींना सर्व माहिती असूनही अद्याप ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे कोणताही जीवितहानीचा प्रकार होऊ नये, यासाठी आम्ही स्वतः पुढाकार घेतला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. येत्या काही दिवसांत या ठिकाणी मोठे चेतावणी फलक व दिशादर्शक सूचना लावण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. हा आमचा तात्पुरता आणि छोटासा प्रयत्न आहे. मात्र शासन-प्रशासना आणि लोकप्रतिनिधींने त्वरित दखल घेऊन येथे मजबूत तटबंदी उभारावी आणि अतिवृष्टीमुळे खचलेला रस्ता कायमस्वरूपी दुरुस्त करावा, अन्यथा या परीसरातील आम्ही सर्व तरुण एकत्र येऊन रास्तारोको आंदोलन करु अशी ठाम भूमिका या तरुणांनी घेतली आहे. तरुण भारतच्या एका बातमीमुळे तरुणांमध्ये निर्माण झालेली ही जागरूकता कौतुकास्पद असली, तरी आता प्रशासनानेही याची गंभीर दखल घेऊन तातडीची उपाययोजना करणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात एखादी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## पाचपिंपळीच्या नेत्र तपासणी शिबिरात ३२५ रुग्णांची तपासणी

**तभा वृतसेवा**
**बिलोली, दि. २५ डिसेंबर-**

बिलोली तालुक्यातील पाचपिंपळी येथील कै. गंगाबाई रावसाहेब पाटील पाचपिंपळीकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेल्या भव्य नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरात सोमवारी ३२५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. ज्यात ५२ रुग्ण हे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पात्र ठरले आहेत. गेल्या अनेक वर्षांपासून आयोजकांनी निरपेक्ष सेवेचा हा वारसा चालवीत आहेत.

बिलोली तालुक्यातील पाचपिंपळी येथील कै. गंगाबाई रावसाहेब पाटील यांच्या स्मरणार्थ प्रतिवर्षी नेत्ररोग तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन केले जाते. त्याच अनुषंगाने यंदा सोमवारी या शिबिराचे आयोजन पाचपिंपळी येथे करण्यात आले. प्रारंभी या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. नेत्र लायन्स क्लब च्या तज्ज्ञ डॉक्टरांनी येथील शिबिरात तपासणी केली. उद्घाटन कार्यक्रमास आनंदराव माली पाटील काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष शिवाजी पाटील पाचपिंपळीकर, बिलोली पं.स.चे माजी उपसभापती शंकर यंकम, दिलीप पांढरे, सरपंच कमल किशोर जाधव, विजय जाधव, बिलोली शहर काँग्रेसचे अध्यक्ष वलिओद्दीन फारुखी, अमजद चाऊस, कासराळी ग्रामपंचायतचे सदस्य शिवा पाटील कासराळीकर, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक पांडुरंग रामपुरे, किशन कमळेकर यांच्यासह अनेक काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## कै. सुभाष पेरकेवार यांना नायगांव तालुका पत्रकार संघाची श्रद्धांजली



**तभा वृतसेवा**
**नायगाव, दि. २५ डिसेंबर-**

नायगांव तालुक्यातील पत्रकारितेच्या क्षेत्रात सामाजिक बांधिलकी, सत्यनिष्ठा आणि निर्भीड लेखणीचा ठसा उमटविणारे ज्येष्ठपत्रकार कै. सुभाष पेरकेवार यांच्या दुःखद निधनाने संपूर्ण तालुक्यात हळहळ व्यक्त होत आहे.

नरसी येथील दैनिक प्रजावाणीचे ज्येष्ठ पत्रकार म्हणून त्यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून ग्रामीण जनतेच्या प्रश्नांना सातत्या ने वाचा फोडली. कै.सुभाष पेरकेवार यांनी सुमारे २५ वर्षे पत्रकारितेत कार्यरत राहून शेतकरी, कष्टकरी, वंचित व उपेक्षित घटकांच्या समस्या अधिक प्रभावीपणे समाजासमोर मांडल्या. अनेक सामाजिक प्रश्नांना न्याय मिळवून देण्यात त्यांची भूमिका मोलाची ठरली आहे. त्यांचा प्रामाणिकपणा, निर्भीडपणा आणि सामाजिक जाणीव हीच त्यांच्या पत्रकारितेची खरी ओळख होती.

या दुःखद घटनेनंतर नायगांव तालुक्यातील मराठी पत्रकार संघाच्या वतीने दि. २४ डिसेंबर रोजी नरसी येथील शासकीय विश्रामगृहाच्या भव्य प्रांगणात कै. सुभाष पेरकेवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. प्रारंभी ज्येष्ठ मान्यवरांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहण्यात आली.

या श्रद्धांजली सभेस मराठी पत्रकार संघाचे माजी जिल्हाध्यक्ष सूर्यकांत सोनखेडकर, जिल्हा उपाध्यक्ष प्रभाकर लखपत्रेवार, माजी तालुकाध्यक्ष माणिक लोहगांवे, लक्ष्मण बर्गे, उपाध्यक्ष गोविंद टोकलवाड यांच्यासह पत्रकार,लोकप्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित सर्वांनी उभे राहून एक मिनिट मौन पाळून कै.पेरकेवार यांना श्रद्धांजली अर्पण केली.

याप्रसंगी विविध दैनिकांचे प्रतिनिधींनी कै. सुभाष पेरकेवार यांच्या पत्रकारितेतील आठवणींना उजाळा देत त्यांच्या सामाजिक योगदानाचा गौरव केला. त्यांच्या निर्भीड लेखणीने ग्रामीण समाजाला दिशा दिली, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

कै.सुभाष पेरकेवार यांच्या अकाली जाण्याने नायगांव तालुक्यातील पत्रकार संघ पोरका झाला असून, त्यांचे कार्य व विचार भावी पिढीतील पत्रकारांसाठी दीपस्तंभ ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

या श्रद्धांजली कार्यक्रमाला गंगाधर भिलवंडे, आनंदराव सूर्यवंशी, शेषेराव कंधारे, गंगाधर गंगासागरे, दिलीप वाघमारे, जाफर भाई, नागेश कल्याण, माधव बैलकवाड, देविदास सुर्यवंशी, आजिमभाई, तानाजी शेळगांवकर, हाणमंत चंदनकर मारोती सुर्यवंशी, प्रकाश महिफळे, कैलास तेलंग, अंकूश देगांवकर, किरण औराळकर, शाम चोंडे, आरिफ भाई, प्रमेश्वर जाधव, हाणमंत चंदनकर, निळकंठ जाधवसह सामाजिक कार्यकर्ते साईनाथ जिगळेकर, माधव कोरे, मारोती मेटकर, धम्मदीप भद्रे, माधवराव चिंतले, साईनाथ सह अनेक वृत्तपत्राचे प्रतिनिधी व सोशल मिडियाचे प्रतिनिधीसह सामाजिक क्षेत्रा तील ही यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी आमदार अमरनाथ राजूरकर यांच्या वाढदिवसानिमित्त अन्नदान

**नांदेड** -भाजपा महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजुरकर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीचे माजी सरचिटणीस क्षितिज जाधव व मित्रपरिवाराच्यावतीने शहरातील सुमन बालगृह येथे अन्नदान करण्यात आले. भाजपा दक्षिण विधानसभा प्रमुख डॉक्टर सचिन आंबेकर यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपा महानगर अध्यक्ष तथा माजी आमदार अमरनाथ राजुरकर यांचा वाढदिवस क्षितिज जाधव व मित्र परिवाराच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील रामनगर येथील सुमन बालगृहातील मुलींना अन्नदान करण्यात आले. यावेळी विलास देवळे, संजय गायकवाड, सचिन कपाळे, पवन जाधव, संजय घुले, सिद्धार्थ सातोरे, यादव कंधारे, भीमा राजभोज, अजय खिल्लारे, संदेश देवके, हणमंत येमुनवाड,आकाश लेवडे, रतन सोनकांबळे, निखील मुंडे आदींची उपस्थिती होती.



## खा.आष्टीकरांचे कट्टर समर्थक शशिकांत माळोदे संचालकपदी बिनविरोध

**हदगाव** -विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी हदगावच्या रिक्त असलेल्या जागी हिंगोली लोकसभा मतदारसंघाचे खा. नागेश पा. आष्टीकर यांचे कट्टर समर्थक शशिकांत शिवराज माळोदे यांची संचालकपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीवर हिंगोली लोकसभा मतदार संघाचे खा. नागेश पा. आष्टीकर यांचे वर्चस्व आहे. काही महिन्यापूर्वी संचालकाच्या निधनामुळे एक जागा रिक्त झाली होती त्या ठिकाणी खा.नागेश पा. आष्टीकर व मराठवाडा युवासेना सचिव कृष्णा पाटील आष्टीकर यांनी आपला कट्टर समर्थक असलेल्या शशिकांत माळोदे यांचे नाव समोर केले. एकच उमेदवारी अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी तथा सहायक निबंधक एस. जी. गन्लेवार यांनी शशिकांत शिवराज माळोदे यांची विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीच्या संचालकपदी बिनविरोध निवड झाल्याचे घोषित केले. यावेळी चेअरमन ज्ञानेश्वर जाधव, व्हाईस चेअरमन पंडितराव घुन्नर, संचालक जीवनराव देशमुख,प्रकाशराव देशमुख, राजेश्वर तालंगकर, भाऊसाहेब तालंगकर,शफी पटेल,श्रीमती सुमित्राबाई गोदजे, सौ दुर्गा कोल्हे, धम्मपाल वाठोरे, रामचंद्र लकडे आदी उपस्थितीत होते. संस्थेचे सचिव संजय तवर, कर्मचारी बी.शी.शाहा व संजय लहानकर यांनी सभा यशस्वी केली.




# हॉकी स्पर्धा ; पंजाब पोलीस, मुंबई, जालंधर आणी नागपुर उपांत्य फेरीत!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ डिसेंबर-**

येथे सुरु असलेल्या श्री गुरु गोबिंद सिंघजी अखिल भारतीय गोल्ड अँड सिल्वर कप हॉकी स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पंजाब पोलीस, एमपीटी मुंबई, बीएसएफ जालंधर आणी ऑरेंज सीटी नागपुर संघांनी प्रवेश मिळवला आहे. शुक्रवारी दुपारी एक वाजता पंजाब पोलीस विरुद्ध पोर्ट ट्रस्ट मुंबई यांच्यात पहिला सामना खेळला जाणार आहे. तर लगेच दूसरा सामना उपांत्य सामना बॉर्डर सिक्योरिटी फोर्स जालंधर आणी ऑरेंज सीटी नागपुर संघा दरम्यान खेळला जाईल.

गुरुवारी सकाळी उपांत्य पूर्व फेरीच्या सामन्यांना सुरुवात झाली. पहिला सामना पंजाब पोलीस विरुद्ध ए. जी. नागपुर संघा दरम्यान खेळण्यात आला. हा सामना पंजाब पोलीस संघाने ३ विरुद्ध ० गोल अंतराने जिंकला. अति चुर्शीच्या सामन्यात तीन सत्रात गोल होऊ शकले नाही. खेळाच्या ४६ मिनिटाला नवप्रीतसिंघ याने पंजाब साठी सुरेख मैदानी गोल केला. त्यानंतर ४९ व्या मिनिटाला पंजाब संघाच्या हरदीप सिंघ याने पेनल्टी स्ट्रोक मध्ये गोल केला. तर सामना संपन्याच्या काही क्षणपूर्वी सिमरजीत सिंघ याने निर्णायक मैदानी गोल केला.



आजचा दूसरा सामना आर्मी इलेवन जालंधर विरुद्ध पोर्ट ट्रस्ट मुंबई संघात खेळला गेला. मुंबई संघाने हा सामना टाई ब्रेकर शूटआउट मध्ये ३ विरुद्ध २ गोल अंतराने जिंकत उपांत्य फेरीत स्थान मिळवला. तत्पूर्वी दोन्ही संघाने एक विरुद्ध एक गोल केला होता. म्हणून सामन्याचा निर्णय टाई ब्रेकर शूटआउट प्रणालीने घेण्यात आला. मुंबई संघ उद्या उपांत्य फेरीत खेळतांना दिसेल.

आजचा तीसरा सामना बीएसएफ जालंधर विरुद्ध संभाजीनगर संघा दरम्यान खेळला गेला. दोन्ही संघांनी परस्परा विरोधात तीन - तीन गोल केले आणी सामना अनिर्णीत राहिला. प्रेक्षकांची उत्कंठा ऊंचावणाऱ्या या सामन्यात शेवटी जालंधर संघाने टाईब्रेकर शूटआउट मध्ये ४ विरुद्ध ३ गोल अंतराने विजय मिळवला. सामना गमावणाऱ्या संभाजी नगर संघाने खेळ कौशल्याचे प्रदर्शन करत सर्वांची मने जिंकली. जालंधर तर्फे नवीन कुमार तिर्की ने एक तर करणपालसिंघ याने दोन गोल केलेत. संभाजी नगर तर्फे मानसरिज ब्रो, आशीष शेट्टी आणी मोहित यांने प्रत्येकी एक गोल केला.

आजचा चौथा सामना ए. जी. हैदराबाद आणी ऑरेंज सीटी नागपुर संघात खेळला गेला. हा सामना ऑरेंज सीटी नागपुर संघाने ५ विरुद्ध १ गोल अंतराने जिंकत उपांत्य फेरीत प्रवेश निश्चित केला. नागपुर तर्फे अलमाज खान, नियाज रहीम सय्यद, अनास मोहम्मद, अखिल वेंकट नंदिमिंटी आणी नियाज सय्यद यांनी प्रत्येकी एक एक गोल केला. तर हैदराबाद तर्फे मणिकांठा वी यांनी एकमात्र गोल केला.

## श्याम बन यांना कृषिरत्न पुरस्कार

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ डिसेंबर-**



देशाचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त दिला जाणारा कृषिरत्न प्रेरणा पुरस्कार नांदेडचे भूमिपुत्र श्याम बन होटाळकर यांना जाहीर करण्यात आला आहे. हा पुरस्कार नाशिक येथे मान्यवरांच्या उपस्थितीत भव्य समारंभात प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती जय किसान फार्मर्स फोरमचे अध्यक्ष संजय जाधव यांनी दिली आहे.

# अपघातातील दोघा गंभीर जखमींपैकी एकाचा मृत्यू

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २५ डिसेंबर-**

तीन दिवसांपूर्वी माहूर तालुक्यातील गोंडवडसा येथील दोन तरुण मौजे वझरा येथील शेख फरीद बाबा यांच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन करून परत येताना त्यांच्या दुचाकीचा दुर्दैवी अपघात झाला. या अपघातात आदिल नजीर शेख वय २१ वर्ष याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असून आमीन नजीर कुरेशी वय २१ हा गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात उपचार घेत आहे. जर माहूर येथे ट्रॉमा केअर सेंटर असते तर या अपघातात मृत पावलेल्या तरुणाचा जीव वाचला असता. अशा खंतयुक्त प्रतिक्रिया जखमीचे नातेवाईकांनी व्यक्त केल्या आहेत.



तीन दिवसांपूर्वी गोंडवडसा येथीलआदिल नजीर शेख व आमीन नजीर कुरेशी हे दोघे दुचाकीवरून शेख फरीद बाबाच्या दर्शनासाठी गेले होते. दर्शन आटोपून परत येताना एका तीव्र वळणावर अंदाज चुकल्याने त्यांची दुचाकी रस्त्यावरून घसरून भीषण अपघात झाला. या अपघातात दोघेही गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती आयान रोशन कुरेशी यांनी तात्काळ दूरध्वनीद्वारे घरच्यांना दिली. माहिती मिळताच कुटुंबीयांनी दोघांनाही त्वरित माहुर येथील रुग्णालयात दाखल केले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी नागपूर येथील रुग्णालयात हलविण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला. दरम्यान नागपूर येथील रुग्णालयात आदिल नजीर शेख यांच्यावर आयसीयू मध्ये तीन दिवस उपचार सुरू होते. मात्र बुधवारी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास त्याचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने गोंडवडसा परिसरात शोककळा पसरली आहे. दरम्यान आमीन याच्या वर उपचार सुरू आहेत.

अनेक वर्षापासून माहूर येथील ग्रामीण रुग्णालयात ट्रॉमा केअर सेंटर बनवावे अशी मागणी होत असून ट्रॉमा केअर सेंटर असते तर कंदील या तरुणाचा जीव वाचला असता अशा संतप्त आणि तीव्र प्रतिक्रिया नागरिकातून व्यक्त होत आहेत.

## सूभद्राबाई धोंडीबा बोईनवाड यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २५ डिसेंबर-**



येथील जेष्ठ महिला कै.सूभद्राबाई धोंडीबाबोईनवाड (७० वर्षे) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले त्यांच्यावर बा-हाळी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले त्यांच्या पश्चात तिन मूले ,सूना नातवंडे असा मोठा परीवार आहे राजकूमार,संतोष ,संजय बोईनवाड यांची आई होत.

# आर्दश गावचे गटशिक्षण अधिकारी आता शिक्षकांना शिक्षणाची पंढरी दाखवणार : सतीश दर्शनवाड

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. २५ डिसेंबर-**

उमरी तालुक्यातील आदर्श जिरोणा या गावात जन्म झालेले सतिश दर्शनवाड हे उमरी तालुक्यात गटशिक्षण अधिकारी म्हणून कार्यरत आहेत पण त्यांनी शिक्षकाच्या मदतीने शिक्षणाची पंढरी करणार असे ब्रिद वाक्या नानू नाईक तांडा जिल्हा परिषद शाळेत पालक मेळ्यात मार्गशन करताना बोलत होते .

हा पालक मेळावा शिक्षण विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे व मुख्याध्यापक नागलवाड , चव्हाण , लांब मॅडम शाळेचे शालेय समिती हा दुहेरी सांगड घालून हा कार्यक्रम दि २३ डिसेंबर २०२५ रोजी शंभर टक्के पालकाच्या उपस्थित पहिले सत्र पार पडले . दुपारच्या सत्रा नंतर गटशिक्षण अधिकारी सतिश दर्शनवाड यांच्या मार्गदर्शनात शिक्षण परिषद यशास्वी झाली . या मेळाव्याचे केंद्रीय मुख्याध्यापक पुटवाड व तसेच उपक्रमशील शिक्षक परेवार यांनी ही पालक मेळाव्यास मार्गदर्शन केले आहे . विशेष म्हणजे कस्तुरबा गांधी विद्यालयातील मंचलकर ह्या शिक्षीका अंधश्रध्दे वरिल एकांकीका व टाळी योगा असे विविध कार्यक्रम घेवून पालक वर्गानां प्रबोधन केले आहे. या वेळी उमरी तालुक्याचे गटशिक्षण अधिकारी सतिश दर्शनवाड , उमरीचे लाडके शिक्षण विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे , केंद्रप्रमुख एम सी पवार , पदोन्नती मुख्याध्यापक पाटील , बितनाळ मुख्याधापक मोरे सर , केद्रां अतर्गत सव मुख्याध्यापक उपस्थित होते . नवोपक्रमाची माहीती शिक्षक चव्हाण यांनी दिली , शाळेच्या व विद्यार्थी यांच्या समस्या बद्दल पालकांनी हि मनोगत व्यक्त केले . विशेषता विस्तार अधिकारी शंकर बेळकोणे यांनी वस्ती तांड्यावरिल शाळेतील विद्यार्थी व पालकांचे कौतुक केले . मिशन अक्षर वाचन टप्पा उपक्रमाची सर्व तालुक्यातील शिक्षकांनी गुणवत्ता वाढीचे अव्हाण केले या तांड्यातील शाळा ८२ टक्के पटाची संख्य विद्यार्थीची राहू शकते इंग्रजी शाळेत न जाता दिड किमी पायी प्रवास करतात हे इतर शाळे चे विद्यार्थी व पालकाच्या मदतीचा आर्दश घेतला पाहिजे हे उदाहरणं देत तांडा वस्ती शाळेचे कौतूक गटशिक्षण सतिश दर्शनवाड यांनी केले आहे पुढे दर्शनवाड म्हणाले माजे गाव उमरी तालुक्यातील जिरोणाआर्दश असुन त्या गावात माझा जन्म झाला या जन्म भुमिचे कांही देण घेण लागत म्हणून शिक्षणाची पंढरी करणार असल्याचे सांगितले आहे . विद्यार्थ्यांनी स्वतः ची सुरक्षता या बदला शालेय समित्या हे कोणते नियोजन करायला पाहिजे यांचे सविस्तर माहिती शिक्षक मनिषा पगारे यांनी दिली आहे . शेळके व डॉक्टर जंयत नारळीकर खान अकॅडमी संदर्भात शिक्षक आणि विद्यार्थीना लॉगिंग प्रात्यक्षिक करून घेतले यावेळी या तांड्यातील शालेय विद्यार्थीनी बंजारा पारंपारिक पोशाखात विविध नृत्यू सादरीकरण केले केंद्रा अंतर्गत नविन्यपुर्ण उपक्रमाची माहिती देखिदास गोडगे दिली आहे या शाळेचे मुख्याध्यापक दिगांबर नागलवाड यांनी सर्वाचे आभार मानले आहे .

